दैनिक अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३२२ । शनिवार ५ सप्टेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## १५ सप्टेंबरपर्यंत री-केवायसी करा... अन्यथा यूपीआय पेमेंट बंद!



**नवी दिल्ली :** देशभरातील लाखो लहान-मोठ्या दुकानदार आणि रस्त्यावरील विक्रेत्यांची री-केवायसी प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्याने १५ सप्टेंबरनंतर डिजिटल पेमेंट सेवांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ऑनलाइन पेमेंट सुविधा देणाऱ्या कंपन्यांनी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे री-केवायसीसाठीची अंतिम मुदत वाढवण्याची मागणी केली आहे. पेटीएम आणि फोनपे यांसारख्या कंपन्यांच्या मते, लाखो व्यापाऱ्यांची पडताळणी प्रलंबित असून, निर्धारित मुदतीत प्रक्रिया पूर्ण करणे मोठे आव्हान आहे. मुदतवाढ न मिळाल्यास री-केवायसी अपूर्ण असलेल्या व्यापाऱ्यांची खाती तात्पुरती ब्लॉक होऊ शकतात, ज्यामुळे यूपीआय आणि कार्ड पेमेंटमध्ये अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.अहवालानुसार, क्यूआर कोड वापरणाऱ्या सुमारे ३० ते ३५ टक्के लहान विक्रेत्यांवर परिणाम होऊ शकतो. कागदपत्रांची कमतरता आणि प्रत्यक्ष पडताळणीच्या कडक नियमांमुळे प्रक्रिया रखडत असल्याचे सांगण्यात येत आहे.

# मराठा विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षणाचा 'दरवाजा' खुला!

## सारथी शिष्यवृत्तीवरील रकमेची मर्यादा हटविली; संपूर्ण शिक्षण शुल्क थेट संस्थेला - मराठा व मराठा-कुणबी विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मराठा आणि मराठा-कुणबी विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्य सरकारने परदेश शिक्षणाच्या दिशेने मोठे पाऊल टाकले आहे. सारथी संस्थेच्या परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजनेतील लाभांवरील रकमेची मर्यादा संपुष्टात आणण्यात आली असून, परदेशातील शैक्षणिक संस्थेचे संपूर्ण शिक्षण शुल्क आता संबंधित यंत्रणेमार्फत थेट संस्थेला देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे परदेशात उच्च शिक्षणाचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.

सारथी संस्थेने परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजनेत महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. शिक्षण शुल्कासाठी असलेली आर्थिक मर्यादा हटविल्याने नामांकित परदेशी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांसाठी मोठा अडथळा दूर झाला आहे.

विद्यार्थ्यांना पुस्तके, स्टेशनरी, प्रबंध तयार करणे, स्थानिक प्रवास आणि इतर आवश्यक खर्चांसाठीही स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. यानुसार अमेरिका व इतर देशांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी १,५०० अमेरिकन डॉलर, तर युनायटेड किंग्डममध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना १,१०० पौंड इतका निर्वाह व शैक्षणिक खर्चासाठी भत्ता मंजूर करण्यात आला आहे.

या योजनेत विद्यार्थ्यांची निवड करताना आता क्यूएस जागतिक विद्यापीठ क्रमवारीचा विचार करण्यात येणार आहे. दोन किंवा अधिक विद्यार्थ्यांच्या विद्यापीठांचे क्रमांक समान




असल्यास संबंधित विद्यार्थ्यांच्या मागील पदवी परीक्षेतील गुणांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

या बदलांसंदर्भात सारथी संस्थेने महाराष्ट्राच्या नियोजन विभागाकडे मार्गदर्शन मागितले होते. त्यानंतर नियोजन विभागाने सारथीला पत्राद्वारे आवश्यक बदलांबाबत कळविले आहे.

शिष्यवृत्तीवरील रकमेची मर्यादा हटविण्याचा निर्णय मराठा आणि मराठा-कुणबी विद्यार्थ्यांसाठी 'गेमचेंजर' ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, परदेशातील उच्च शिक्षणाचे स्वप्न आता अधिक विद्यार्थ्यांच्या आवाक्यात येणार आहे.

### उपोषणावर जरांगे ठाम



ओबीसींच्या नावावर त्यांनी सगळं खाल्लं, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांच्यावर टीका केली. वेळ पाहून कधी महाविकास आघाडीमध्ये जातात, कधी महायुतीमध्ये जातात, कधी अजितदादांसोबत जातात. यांनी ओबीसी महमंडळ खाल्लं, महाराष्ट्र सदनही सोडलं नाही, अशी जळजळीत टीका जरांगे यांनी भुजबळांवर केली. या वयात त्यांनी स्वतःचं राजकारण पाहावं, पुतण्याला खासदार कसं करता येतं ते पाहावं, असा उपरोधिक सल्लाही त्यांनी दिला. दरम्यान, राज्यात ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्यांना प्रमाणपत्र देण्यात यावं, यासह मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे हे अंतरवाली सराटीमध्ये उपोषणाला बसले आहेत. राज्य सरकारच्या मंत्र्यांच्या शिष्टमंडळाने त्यांच्या मागण्या मान्य केल्या असल्या तरी त्याची अंमलबजावणी होईपर्यंत उपोषण सोडणार नाही, असा पवित्रा जरांगे यांनी घेतला आहे.

### सरकार आणण्यात ओबीसींचा महत्त्वाचा हातभार



जात पडताळणी समिती ही महत्त्वाची समिती आहे. त्याच्यावर कुणीही दबाव आणता कामा नये. काही प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने नाकारली आहेत. ती दुरुस्त करून देतो, असं काही आमदार म्हणाले आहेत. आता माझा त्या आमदारांना सवाल आहे की, मुंबईत ४ नगरसेवकांचं जात पडळणीत प्रमाणपत्र रद्द ठरलं आहे. त्यामुळे त्यांचं नगरसेवक पद गेलं आहे. आता ते देखील तुम्ही दुरुस्त करून देणार आहात का? मराठा समाजाकडून कुणबी प्रमाणपत्र घेताना दाखल्यावर खडाखोडी करण्यात आल्या आहे. आता ते दाखले तुम्ही स्वीकारणार आहात का? जात पडताळणी समितीवर कुणीही दबाव आणू नये. राज्यातील महायुतीच्या नेत्यांनी लक्षात घ्यावे ओबीसींनी तुम्हाला मदत केली आहे. तुमचं सरकार आणण्यात ओबीसींचा महत्त्वाचा हातभार आहे.

**-छगन भुजबळ, अन्न व नागरी पुरवठा मंत्री**

## मनोज जरांगेंच्या आंदोलनाला जामखेडकरांचा पाठिंबा : जामखेड शहर कडकडीत बंद



■ अखंड मराठा समाज जामखेड तालुक्याच्या वतीने करण्यात आलेल्या या बंदच्या माध्यमातून मराठा समाजाने आपली मजबूत एकजूट दाखवून दिली. शासनाने मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेऊन मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांवर त्वरित व सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी सर्वस्तरातून करण्यात आली.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** मराठा आरक्षणासह समाजाच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी शुक्रवारी जामखेड शहर व तालुक्यात उत्स्फूर्त बंद पाळण्यात आला. अखंड मराठा समाजाच्या वतीने करण्यात आलेल्या बंदच्या आवाहनाला व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांनी मोठा प्रतिसाद देत आपली दुकाने व व्यावसायिक आस्थापने बंद ठेवली.

सकाळपासूनच जामखेड शहरातील प्रमुख बाजारपेठा, व्यापारी प्रतिष्ठाने आणि विविध व्यावसायिक आस्थापना बंद असल्याचे चित्र पाहायला मिळाले. त्यामुळे शहरातील नेहमीची वर्दळ कमी झाली असून, बंदला नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळाल्याचे दिसून आले.

यावेळी नगरसेवक वसीम सय्यद यांनी पत्रकारांशी बोलताना मराठा आरक्षणाच्या **(पान ४ वर)**

## केंद्राकडे महाराष्ट्राचे ३ हजार कोटी रुपये अडकले

### मंत्री भरत गोगावले यांची माहिती : ठेकेदारांची बिले अडकल्याबाबत स्पष्टीकरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पंढरपूर :** रोजगार हमी योजनेतील ठेकेदारांची गेल्या तीन-चार वर्षांपासून रखडलेली थकीत बिले लवकरच मिळण्याची शक्यता असून, केंद्र सरकारकडे महाराष्ट्राचे तब्बल ३ हजार कोटी रुपये अडकले असल्याचा दावा राज्याचे मंत्री भरत गोगावले



यांनी केला आहे. ही रक्कम राज्याला प्राप्त होताच रोजगार हमी योजनेतील थकीत बिले अदा केली जातील, अशी माहिती त्यांनी दिली.

पंढरपूर दौऱ्यावर असताना प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना गोगावले म्हणाले की, रोजगार हमी योजनेअंतर्गत अनेक ठेकेदारांची बिले प्रदीर्घ काळापासून रखडली आहेत. केंद्राकडून महाराष्ट्राला मिळणारी सुमारे ३ हजार कोटी **(पान ४ वर)**

## शेतीच्या फेरफार नोंदीसाठी लाखाची लाच; मंडलाधिकार्याविरुद्ध कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बीड :** जिल्ह्यातील अंबाजोगाईत शेतीच्या फेरफाराची नोंद करून देण्यासाठी तब्बल एक लाख रुपयांच्या लाचेची मागणी करणाऱ्या एका मंडळ अधिकाऱ्याविरुद्ध बीड एसीबीने कारवाई केली आहे.



सतीश विठ्ठलराव भुसेवाड असे या लाचखोर अधिकाऱ्याचे नाव असून तो अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी सावरगावात सेवेत होता. तक्रारदार यांच्या शेतीच्या फेरफार नोंदीची कार्यवाही करण्यासाठी सतीशने तब्बल एक लाख रुपयांची लाच मागितली होती. यासंदर्भात तक्रारदाराने बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) तक्रार नोंदवली. या तक्रारीची दखल घेत एसीबीच्या पथकाने तातडीने पडताळणी केली असता लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

दरम्यान, कारवाईचा संशय आल्याने अधिकाऱ्याने लाचेची रक्कम स्वीकारली नाही. मात्र, लाच मागितल्याचे सिद्ध झाल्याने त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली. लाच स्वीकारण्यासाठी मागणी केल्याप्रकरणी सतीश भुसेवाडविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, या प्रकरणाचा अधिकचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक दीपकाकडून केला जात आहे.

### चांदीची अंगठी लाच म्हणून स्वीकारणे महागात

नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेला 'ना हरकत दाखला' देण्याच्या मोबदल्यात १२०० रुपये किमतीची चांदीची अंगठी लाच म्हणून मागणाऱ्या कुडाळ नगरपंचायतीच्या स्वच्छता निरीक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून रंगेहाथ ताब्यात घेतले. पांडुरंग वासुदेव नाटेकर असे त्याचे नाव आहे. कुडाळ येथे 'पदमगड ज्वेलर्स' नावाचा व्यवसाय सुरू करण्यासाठी नगरपंचायतीकडे ना हरकत दाखल्यासाठी अर्ज केला होता. हा दाखला मंजूर करून देण्याच्या मोबदल्यात स्वच्छता निरीक्षक पांडुरंग नाटेकरने १२०० रुपये किंमतीची नवीन खडा असलेली चांदीची अंगठी लाच म्हणून मागितली होती.

# तीन महिने पाऊस बेपत्ता...

- उभ्या पिकात सोडली जनावरे..!
- बीड ते अहिल्यानगर दुष्काळाचे सावट गडद
- आष्टीत शेतकरी हतबल, शेवगावात पिके करपली
- तातडीने दुष्काळ जाहीर करण्याची मागणी





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर/बीड :** पावसाळा सुरू होऊन तब्बल तीन महिने उलटले, तरी समाधानकारक पावसाने अनेक भागांकडे पाठ फिरवल्याने मराठवाडा आणि नगर जिल्ह्यात दुष्काळाचे सावट अधिक गडद होत आहे. पाण्याअभावी डोळ्यादेखत उभी पिके करपून जात असताना, बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात काही हतबल शेतकऱ्यांवर उभ्या पिकातच जनावरे सोडण्याची वेळ आली आहे. दुसरीकडे, अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातही पावसाने दडी मारल्याने भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून शेतकऱ्यांचे अर्थकारण कोलमडण्याच्या मार्गावर आहे.

आष्टी तालुक्यात पावसाअभावी उभी पिके वाया गेली असून जनावरांसाठी चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे काही शेतकऱ्यांनी पिकातून उत्पादन मिळण्याची आशा सोडून थेट जनावरे शेतात सोडली आहेत. 'जनावरांना चारा आणि पाणी कसे द्यायचे?' असा हताश सवाल शेतकरी करीत असून त्यांच्या व्यथा आता सरकारपर्यंत पोहोचविण्याची मागणी होत आहे. या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली. मराठवाड्यात तातडीने दुष्काळ जाहीर करून स्वतंत्र दुष्काळी पॅकेज द्यावे, जनावरांसाठी चारा-पाण्याची व्यवस्था करावी आणि शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा मिळावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. १७ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रश्नावर निर्णय व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

शेवगाव तालुक्यातही परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. गेल्या तीन महिन्यांपासून समाधानकारक पाऊस नसल्याने सोयाबीन, बाजरी, कपाशी, तूर, मूग, उडीद आणि ऊस या प्रमुख पिकांवर संकट ओढवले आहे. शेतातील उभी पिके करपून जात असल्याने हाता-तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याची भावना शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे. परिस्थितीची तातडीने दखल घेऊन प्रशासनाने नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करावेत आणि शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# 'जेन झी'च्या शौर्याला सलाम!

## अमृतनगरची दहीहंडी पुन्हा 'हाऊसफुल'च्या उंबरठ्यावर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** गतवर्षीच्या दहीहंडी उत्सवात जय जवान गोविंदा पथकाने सर्वप्रथम १० थरांचा मानवी मनोरा रचत विश्वविक्रमाची नोंद केली आणि संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतलेली घाटकोपरमधील अमृतनगरची दहीहंडी यंदाही भव्यदिव्य स्वरूपात रंगणार आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे घाटकोपर विभागाध्यक्ष गणेश चुक्कल यांनी यावर्षीची दहीहंडी आजच्या तरुणाईच्या संघर्षाचे प्रतीक ठरलेल्या 'जेन झी'च्या शौर्याला समर्पित केली आहे. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार आणि अनागोंदी कारभाराविरोधात संतप्त झालेल्या जेन झी तरुणांनी एकत्र येत उभारलेल्या संघर्षाने देशाचे लक्ष वेधून घेतले. अन्यायाविरोधात तरुणाईने दाखविलेली एकजूट, संघर्षाची ताकद आणि परिवर्तनाची जिद्द ही आजच्या पिढीची खरी ओळख ठरली आहे. या तरुणाईच्या शौर्याला सलाम करण्याच्या उद्देशाने गणेश चुक्कल यांनी अमृतनगरच्या दहीहंडी उत्सवाची संकल्पना यंदा विशेष पद्धतीने मांडली आहे.

गतवर्षीप्रमाणे यंदाही अमृतनगरच्या दहीहंडीला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत ९८० हून अधिक गोविंदा मंडळांनी सहभागासाठी नोंदणी केली आहे. त्यामुळे अमृतनगरचे सर्कल पुन्हा एकदा हजारो गोविंदांच्या उत्साहाने आणि प्रचंड जनसागराने फुलून जाणार असल्याचे चित्र आहे.या भव्य उत्सवात भारतीय क्रिकेटपटू सूर्यकुमार यादव, अभिनेता रितेश देशमुख आणि जेनेलिया देशमुख यांच्यासह 'हास्यजत्रा'मधील कलाकार प्रियदर्शनी इंदलकर, रोहित माने आणि प्रतीक्षा कोते, सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदे, तसेच क्रे टेक्स यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. विशेष म्हणजे जपानमधील परदेशी नागरिकही या उत्सवाला हजेरी लावणार असल्याने अमृतनगरच्या दहीहंडीला यंदा आंतरराष्ट्रीय रंगत मिळणार आहे.१० थरांच्या ऐतिहासिक विक्रमामुळे गतवर्षी जगाच्या नकाशावर झळकलेल्या अमृतनगरच्या दहीहंडीची यंदाची संकल्पना 'तरुणाईच्या शौर्याला सलाम' अशी असल्याने उत्सवाबाबतची उत्सुकता अधिकच वाढली आहे. ९८० हून अधिक मंडळांचा सहभाग, नामवंत कलाकारांची उपस्थिती आणि विक्रमी गर्दीच्या पार्श्वभूमीवर अमृतनगरचे सर्कल यंदाही अक्षरशः 'हाऊसफुल' होणार असल्याची चर्चा आहे.

# पाऊस अनिश्चित; पण शेतीचे नियोजन तरी निश्चित हवे!

**अग्रलेख**

करण नवले

अहिल्यानगर जिल्ह्याची ओळख ही शेती आणि शेतकऱ्यांच्या कष्टांशी जोडलेली आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून बदलत्या हवामानाने या जिल्ह्यातील शेतीसमोर नवे आणि गंभीर आव्हान उभे केले आहे. कधी समाधानकारक पाऊस पडत नाही, कधी पावसाचा दीर्घ खंड पडतो, तर कधी अचानक अतिवृष्टी होऊन पिकांचे नुकसान होते. एकीकडे दुष्काळाचे चटके आणि दुसरीकडे अतिवृष्टीची झळ, या दोन्ही टोकाच्या परिस्थितीशी अहिल्यानगरचा शेतकरी सातत्याने सामना करीत आहे.

यंदाच्या खरीप हंगामातही जिल्ह्यातील अनेक भागांत पावसाच्या असमान वितरणाने शेतकऱ्यांची चिंता वाढविली आहे. विशेषतः शेवगाव, पाथर्डी आणि काही दुष्काळप्रवण पट्ट्यांमध्ये पावसाच्या दीर्घ खंडामुळे खरीप पिके संकटात आली आहेत. सोयाबीन, बाजरी, तूर, मूग, उडीद, कपाशी आणि इतर पिकांची वाढ खुंटत असून काही ठिकाणी पाण्याअभावी उभी पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून पेरणी केली; मात्र आता आकाशाकडे डोळे लावून बसण्याची वेळ आली आहे.

हा प्रश्न केवळ एका-दोन तालुक्यांपुरता मर्यादित नाही. अहिल्यानगरच्या विविध भागांमध्ये पावसाचे स्वरूप वेगवेगळे आहे. काही भागांत पाणीटंचाईची तीव्रता वाढत असताना इतर भागांत जोरदार पावसामुळे निचऱ्याचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे जिल्ह्याच्या शेतीचा विचार करताना एकच हवामान धोरण सर्वांसाठी लागू करून चालणार नाही. तालुकानिहाय आणि गावनिहाय हवामान व पाणी नियोजन ही आता अत्यावश्यक बाब बनली आहे.

शेतकरी हवामानाच्या अंदाजावर विश्वास ठेवून पेरणी करतो. बियाणे, खत, औषधे, मशागत आणि मजुरीवर खर्च करतो. अनेकदा हा खर्च कर्जातून केला जातो. पाऊस वेळेवर झाला तर पीक उभे राहते; परंतु पावसाने दडी मारली तर त्याच्या डोळ्यांसमोर उभे पीक करपत जाते. अतिवृष्टी झाली तर तेच पीक वाहून जाते. म्हणजे कमी पाऊस असो वा जास्त पाऊस, फटका शेतकऱ्यालाच बसतो.

अहिल्यानगर जिल्ह्याच्या भौगोलिक आणि हवामानविषयक परिस्थितीकडे पाहता पाणी व्यवस्थापन हा शेतीच्या भवितव्याचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. जलसंधारणाची कामे, शेततळी, नालाबांध, पाणलोट विकास आणि भूजल पुनर्भरण यांना दीर्घकालीन स्वरूपात प्राधान्य दिले पाहिजे. पावसाचे पाणी वाहून जाण्यापासून रोखणे आणि उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर करणे, हीच भविष्यातील शेतीची दिशा असली पाहिजे.

परंतु केवळ जलसंधारण पुरेसे नाही. प्रशासनाने 'नुकसान झाल्यानंतर मदत' या पारंपरिक चौकटीतून बाहेर पडण्याची गरज आहे. आज पीक गेले की पंचनामा, नंतर अहवाल आणि मग मदतीची घोषणा, ही प्रक्रिया सुरू होते. मात्र तोपर्यंत शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला असतो. त्यामुळे नुकसान मोजण्यापेक्षा जोखीम ओळखण्याची व्यवस्था उभारली पाहिजे.

शेवगाव, पाथर्डी आणि जिल्ह्यातील इतर दुष्काळप्रवण तालुक्यांसाठी स्वतंत्र हवामान जोखीम नकाशे तयार केले पाहिजेत. कोणत्या गावात पावसाचा खंड पडण्याचा धोका अधिक आहे? कोणत्या भागात भूजल पातळी कमी होत आहे? कोणती पिके उपलब्ध पाण्यात टिकू शकतात? अशा परिस्थितीत कोणती पर्यायी पिके घ्यावीत? या सर्व प्रश्नांची वैज्ञानिक उत्तरे स्थानिक पातळीवर उपलब्ध झाली पाहिजेत.

शेतकऱ्याला वेळेवर हवामानाची माहिती मिळणे तितकेच महत्त्वाचे आहे. केवळ 'पाऊस पडण्याची शक्यता' एवढी सूचना पुरेशी नाही. शेतकऱ्याला त्याच्या गावासाठी अचूक अंदाज हवा. किती दिवस पावसाचा खंड राहील? पुढील पाच ते सात दिवसांत पावसाची शक्यता किती आहे? त्याचा पिकावर काय परिणाम होईल? सिंचनाची गरज आहे का? खत किंवा औषध फवारणी कधी करावी? अशी कृतीशील माहिती त्याच्या मोबाईलवर आणि त्याच्या भाषेत पोहोचली पाहिजे.

हवामानाच्या संकटाबरोबरच बाजारपेठेचा प्रश्नही शेतकऱ्याला सतावत आहे. पीक कमी आले तर नुकसान आणि भरपूर आले तर भाव पडण्याचा धोका, या कोंडीतून शेतकरी कसा बाहेर पडणार? त्यामुळे शेतीचा विचार हवामान, पीक विमा आणि बाजारभाव या तीन वेगवेगळ्या विषयांमध्ये विभागून चालणार नाही. या तिन्ही घटकांचे एकत्रित नियोजन आवश्यक आहे.

पीक विम्याची रक्कम वेळेत मिळणे, नुकसानीचे मूल्यांकन पारदर्शकपणे होणे आणि बाजारभावाची योग्य हमी मिळणे, ही शेतकऱ्याची मूलभूत अपेक्षा आहे. नुकसान झाल्यावर पंचनाम्यांसाठी प्रतीक्षा आणि मदतीसाठी महिने लोटण्याची परिस्थिती बदलली पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पीक नुकसानीचे तातडीने मूल्यांकन करण्याची व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.

अहिल्यानगरच्या शेतीला आणखी एका मोठ्या बदलाची गरज आहे आणि ती म्हणजे पीक विविधीकरण. उपलब्ध पाणी, जमिनीचा प्रकार आणि बाजारपेठ लक्षात न घेता पारंपरिक पद्धतीने एकाच पिकावर अवलंबून राहणे धोकादायक ठरत आहे. शेतकऱ्यांना पर्यायी आणि कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांबाबत प्रभावी मार्गदर्शन मिळाले पाहिजे. त्याचबरोबर ठिबक आणि सूक्ष्म सिंचनाचा विस्तार, प्रक्रिया उद्योग आणि स्थानिक बाजारपेठेशी थेट जोडणी यालाही प्राधान्य द्यावे लागेल. या सर्व प्रक्रियेत कृषी विभाग आणि कृषी विद्यापीठांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कार्यालयात बसून परिपत्रके काढून शेतीचे प्रश्न सुटणार नाहीत. कृषी अधिकारी आणि तज्ज्ञांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन परिस्थिती समजून घेतली पाहिजे. शेवगावात करपत असलेल्या सोयाबीनकडे पाहून, पाथर्डीतील पाण्याच्या प्रश्नांचा अभ्यास करून आणि प्रत्येक भागाच्या भौगोलिक वैशिष्ट्यानुसार मार्गदर्शन देणारी यंत्रणा उभी राहिली पाहिजे. शेतकऱ्याला दया नको; त्याला सक्षम व्यवस्था हवी आहे. वेळेवर पाणी आणि हवामानाची माहिती, योग्य बियाणे, पीक संरक्षणासाठी तंत्रज्ञान, तातडीचा पंचनामा, पारदर्शक विमा आणि उत्पादनाला योग्य भावया साखळीतील प्रत्येक दुवा मजबूत झाला पाहिजे.

अहिल्यानगरच्या शेतकऱ्याने दुष्काळाशी लढण्याची ताकद यापूर्वीही दाखविली आहे. मात्र प्रत्येक वेळी त्याला केवळ संकटाशी झुंज देण्यासाठी सोडून चालणार नाही. निसर्गाच्या अनिश्चिततेला सामोरे जाण्यासाठी शासनाचे नियोजन, प्रशासनाची तत्परता आणि तंत्रज्ञानाची साथ आवश्यक आहे. पाऊस आपल्या हातात नाही. पण पावसाचे पाणी साठविणे, त्याचे नियोजन करणे आणि पावसाच्या बदलत्या स्वरूपानुसार शेतीचे धोरण बदलणे नक्कीच आपल्या हातात आहे. त्यामुळे आज निसर्ग बदलतोय; आता नियोजनही बदलले पाहिजे. पाऊस कमी पडला म्हणून संकट आणि जास्त पडला म्हणूनही संकट, ही स्थिती कायम राहिली तर केवळ निसर्गाला दोष देण्यात अर्थ नाही. पाऊस अनिश्चित असू शकतो; पण शेतकरी आणि शेतीसाठीचे आपले नियोजन मात्र निश्चित, वैज्ञानिक आणि दूरदृष्टीचे असलेच पाहिजे.

# अन्यायाविरोधात विद्रोहाची गर्जना

## अहिल्यानगरमध्ये दलित पँथरची नवी फळी सज्ज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव:** अहिल्यानगर जिल्ह्यात दलित पँथरची संघटनात्मक ताकद गावागावात पोहोचविण्याचा निर्धार राहुरी येथील अहिल्या भवनमध्ये झालेल्या बैठकीत करण्यात आला. दलित पँथरचे संस्थापक पद्मश्री नामदेव ढसाळ व राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत नडगम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हाध्यक्ष पँथर राजूभाऊ आढाव यांच्या अध्यक्षतेखाली १ सप्टेंबर रोजी ही बैठक झाली.




यावेळी कर्जत-जामखेड, पाथर्डी, शेवगाव, संगमनेर, नेवासा यांसह सहा तालुक्यांच्या कार्यकारण्या जाहीर करण्यात आल्या. जिल्हा उपाध्यक्षपदी कल्याण रांधवे, जिल्हा संघटक काशिनाथ चौगुले, सचिव आदिनाथ भालेराव, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष वैशाली गायकवाड, उपाध्यक्ष चित्रा तांबे यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांवर जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माता अहिल्यादेवी होळकर, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. फुले-शाहू-आंबेडकरांच्या समतावादी विचारांचा वारसा पुढे नेत सामाजिक अन्याय, अत्याचार, विषमता व शोषणाविरोधात संविधानिक मार्गाने संघर्ष करण्याचा निर्धार करण्यात आला. बैठकीत गिरीश गायकवाड, विधाटे सर, सचिन साळवे, बाबा साठे, काशिनाथ चौगुले, कल्याण रणदिवे, वैशाली गायकवाड आदींनी मार्गदर्शन केले. बेरोजगारी, शिक्षण, रोजगार, महागाई आणि वंचित घटकांच्या हक्कांच्या प्रश्नांवर चर्चा झाली.

यावेळी जिल्हाध्यक्ष पँथर राजूभाऊ आढाव यांचा पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. अन्यायाविरोधातील लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करताना आढाव यांनी, वंचित व पीडितांच्या हक्कांसाठी पँथरचा संघर्ष संविधानिक मार्गाने सुरूच राहील, असे स्पष्ट केले.

# गोकुळाष्टमी दहीहंडी उत्सवानिमित्त आज कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील टोका-प्रवरासंगम येथील जय मल्हार मित्र मंडळाच्या वतीने गोकुळाष्टमी दहीहंडी उत्सव व त्यानिमित्ताने ग्रामीण भागातील खेळाडूंना वाव मिळण्यासाठी कबड्डी स्पर्धेचे आयोजन शनिवारी दि.५ सप्टेंबर रोजी करण्यात आले असल्याचे आयोजक शांतवन खंडागळे यांनी सांगितले.

मा. मंत्री शंकरराव गडाख मित्र मंडळाच्या खंबीर साथीने युवा नेते उदयन दादा गडाख पाटील यांच्या प्रेरणेने दि.५ सप्टेंबर रोजी दुपारी १ ते सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास या स्पर्धा होत असून मच्छिंद्रनाथ सेवाभावी फाउंडेशनचे अध्यक्ष व नाथभक्त दिलीप राव वाघ पाटील यांनी बक्षिसाच्या माध्यमातून खंबीर साथ या स्पर्धेसाठी दिली आहे.

गोकुळाष्टमीच्या निमित्ताने होणाऱ्या कबड्डी स्पर्धेचे उदघाटन श्रीराम साधना आश्रमाचे महंत स्वामी सुनीलगिरीजी महाराज यांच्या हस्ते व पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.ग्रामिण भागातील खेळाडूंनी व कबड्डी संघांनी त्वरित प्रवरासंगम येथे शांतवन खंडागळे यांच्या ९६५७२४२५०० या भ्रमणध्वनीवर नाव नोंदणी करावी असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.ही कबड्डी स्पर्धा झाल्यानंतर रात्री ८ते ९ यावेळेत होणाऱ्या दहीहंडी फोडण्याच्या स्पर्धेसाठी युवा खेळाडूंनी व गोविंदांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक सिद्धेश्वर बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शांतवन खंडागळे व मार्गदर्शक पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले आहे.

# श्रीरामपूरचे १८ विद्यार्थी 'अबॅकस मास्टर' पदवीचे मानकरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमी आयोजित ५६ वी नॅशनल लेव्हल अबॅकस कॉम्पिटिशन नेवासा येथे पार पडली. या स्पर्धेत अबॅकसचे सर्व स्तर यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या १८ विद्यार्थ्यांना प्रतिष्ठेची 'अबॅकस मास्टर' पदवी प्रदान करण्यात आली.

यावर्षी एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या श्रीरामपूर, बेलापूर, खंडाळा आणि ऑनलाइन शाखांतील पदवी प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये रक्षा सहानी, अविष्कार अनाप, वासिद सय्यद, समायरा तांबोळी, वैष्णवी गोरे, इकरा सय्यद, सानवी काळे, समर्थ झाडबुके, किमया चंदन, समृद्धी वाव्हळ, वीर वाव्हळ, तनिष्का परदेशी, ऋतुराज नवसारे, श्रेया सदाफळ, स्नेहल अभंग, सोनाक्षी फुलपगार, स्वरा खळदकर आणि विद्या म्हस्के यांचा समावेश आहे.



हे यश विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, एकाग्रता आणि गणितीय कौशल्याची पावती मानले जाते. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या श्रीरामपूर शाखा संचालिका सोनाली ठाणगे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे.

# लेकुरवाळी आखाड्यात श्रावणातील कीर्तन सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील लेकुरवाळी आखाडा येथे श्रावण मासानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दररोज रात्री आयोजित करण्यात येणाऱ्या कीर्तन सोहळ्याला भाविकांची मोठी उपस्थिती लाभत असून परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. लेकुरवाळी मातेची पुण्यभूमी असलेल्या लेकुरवाळी आखाडा येथे सालाबादप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिराचे उद्धारक वैकुंठवासी ह.भ.प. बन्सी महाराज तांबे यांच्या कृपाशीर्वादाने, देवगड दत्तपिठाचे महंत राष्ट्रसंत गुरुवर्य ह.भ.प. श्री भास्करगिरीजी महाराज व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने हा सोहळा सुरू आहे. ह.भ.प. बापू महाराज गारुडे व ह.भ.प. ऋषिकेश महाराज वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्याचे मार्गदर्शक ह.भ.प. बापू महाराज गारुडे बेलपांढरीकर व सप्ताह कमिटीच्या वतीने उत्कृष्ट नियोजन करण्यात आले आहे. सोहळ्याची सांगता ५ सप्टेंबर रोजी गोंधवणी येथील ज्ञानाई आश्रमाचे प्रमुख महंत ह.भ.प. ऋषिकेश महाराज वाकचौरे यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. सोहळ्याचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुस्लिम अनाथ शाळेच्या अभ्यासिकेसाठी ३० लाखांचा निधी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव शहरातील मदरसा मिफ्ताहुल उलूम येथील अनाथ आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांची अभ्यासिका व वाचनालयाची समस्या कायमची दूर करण्यासाठी आ. आशुतोष काळे यांनी उपलब्ध करून दिलेल्या ३० लाख रुपयांच्या निधीतून अद्ययावत वाचनालय आणि अभ्यासिकेचे बांधकाम लवकरच सुरु होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक फकीर कुरेशी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत जागेची पाहणी केली.

या निधीमुळे अनाथ व गरीब विद्यार्थ्यांना हक्काची आणि शांत अभ्यासाची जागा उपलब्ध होणार असल्याने शाळेच्या शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.



आ. आशुतोष काळे यांच्या या सहकार्याबद्दल मदरसा प्रशासनाने व स्थानिक नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत. यापूर्वीही मदरसा, कब्रस्तान, संरक्षण भिंत, कब्रस्तान सुशोभीकरण आणि नवीन कब्रस्तान यांसह मुस्लिम समाजाच्या विविध मूलभूत प्रश्नांकडेही गांभीर्याने लक्ष देऊन निधी उपलब्ध करून दिला आहे. याच बरोबर सर्वधर्म समभाव जपतांना सर्व समाजाला सोबत घेवून कोपरगावातील सर्वच जाती धर्माचे सार्वजनिक सभामंडप, मंदिरे बांधण्यासाठी आ. आशुतोष काळे यांनी भरीव निधी दिला आहे. या बद्दल मुस्लिम समाजाच्या वतीने त्यांनी आ.आशुतोष काळे यांचे आभार मानले. यावेळी मुस्लिम समाजबांधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कौशल्य, शिस्त आणि संस्कारांच्या बळावर विद्यार्थ्यांनी करिअर घडवावे : डॉ. प्रदीप दिघे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** आजच्या स्पर्धात्मक युगात कौशल्याधारित शिक्षणाला मोठे महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग केवळ नोकरी मिळविण्यासाठी न करता व्यवसाय व उद्योगाच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीसाठी करावा. ज्ञान, कौशल्य, शिस्त आणि संस्कार यांची सांगड घालून विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवावे, असे प्रतिपादन लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे यांनी केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेअंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), लोणी येथे उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा पदवी प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ. दिघे बोलत होते. कार्यक्रमास आयटीआयचे प्राचार्य अर्जुन आहेर, फार्मसीचे प्राचार्य डॉ. रविंद्र जाधव, ऐश्वर्या थोरात, माजी विद्यार्थी सोमनाथ ढोले, राहुल गागरे, हौशीराम गोताळ, संजय भांगरे यांच्यासह विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते.

डॉ. दिघे म्हणाले की, संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे कार्य सुरू आहे. उद्योग क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञान व व्यावहारिक कौशल्य देण्यावर भर दिला जात आहे. प्राचार्य अर्जुन आहेर यांनी संस्थेतील अभ्यासक्रम, प्रशिक्षण व शंभर टक्के प्लेसमेंटसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. प्रा. राहुल नरवडे, सपना बोर्से व प्रसाद शिरसाठ यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. संजय म्हस्के यांनी केले, तर आभार प्रा. डी. एन. म्हस्के यांनी मानले.

# झगडे फाटा–पोहेगाव रस्त्याची दुरुस्ती तातडीने करा : औताडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** झगडे फाटा–पोहेगाव रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू होणार असून, या काळात वाहतूक पोहेगाव-देडे-कोऱ्हाळे मार्गे वळविण्यात येणार आहे. मात्र, पर्यायी मार्गावर अचानक वाढणाऱ्या वाहतुकीमुळे या रस्त्याचीही दुरवस्था होण्याची शक्यता असल्याने झगडे फाटा–पोहेगाव रस्त्याचे काम तातडीने व जलदगतीने पूर्ण करावे, अशी मागणी पोहेगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमोल औताडे यांनी केली आहे.याबाबत सरपंच अलका जाधव व उपसरपंच अमोल औताडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन दिले आहे. एका रस्त्याच्या दुरुस्तीचा भार दुसऱ्या रस्त्यावर पडून त्याचीही अवस्था खराब होऊ नये, यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. देडे-कोऱ्हाळे, देडे-चांदवड, मढी, कुंभारी आदी गावांतील नागरिकांसाठी पुण्याकडे जाण्यासाठी हा मार्ग सोयीचा असल्याने येथे नियमित मोठी वाहतूक असते. शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, शेतकरी व नागरिकांचीही मोठ्या प्रमाणात ये-जा असते. त्यामुळे पर्यायी मार्गावर अवजड वाहनांच्या वाहतुकीचे नियमन करून नागरिकांच्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी आणि झगडे फाटा–पोहेगाव रस्त्याचे दुरुस्ती काम कमीत कमी कालावधीत पूर्ण करावे, अशी मागणी ग्रामपंचायतीने केली आहे.

# एसटीच्या एनसीएमसी कार्डबाबत सखोल खुलासा करण्याची महिलांची मागणी

## रिचार्जच्या नावाखाली अतिरिक्त पैसे वसुली

**राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी |** महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना एसटी प्रवासात मिळणाऱ्या सवलतीसाठी सुरू करण्यात आलेल्या एनसीएमसी कार्ड योजनेबाबत प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. कार्ड रिचार्ज करताना अतिरिक्त पैसे कपात होत असल्याने शासनाने याबाबत सखोल खुलासा करावा, अशी मागणी महिला प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

एनसीएमसी कार्डवर १०० रुपयांचा रिचार्ज केल्यास एजंटकडून कार्डमध्ये केवळ ८६.१४ रुपये जमा होत असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे १३.८६ रुपये कमी मिळतात. एसटी वाहकाकडून रिचार्ज केल्यास ९८ रुपये जमा होतात. त्यासाठी दोन रुपये गेटवे शुल्क आकारले जाते. या कपातीचा भार प्रवाशांनी का सोसावा, असा सवाल उपस्थित केला जात आहे.



कार्ड प्रणाली सुरू झाल्यानंतर अनेक ठिकाणी सर्व्हरची अडचण, कार्ड रीड न होणे आणि रिचार्जमध्ये त्रुटी येत असल्याच्या तक्रारी आहेत. तांत्रिक अडचणींमुळे १४ सप्टेंबरपर्यंत मॅन्युअल तिकिटावर सवलत देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. नोंदणी असून कार्ड मिळालेले नाही, अशा प्रवाशांना पावतीच्या आधारे ३० सप्टेंबरपर्यंत मॅन्युअल तिकिटावर सवलत मिळणार आहे.

ग्रामीण भागातील अनेक गावांपासून एसटी आगार ३० ते ३५ किलोमीटर अंतरावर आहेत. त्यामुळे केवळ रिचार्जसाठी तालुक्याच्या ठिकाणी जाणे प्रवाशांना शक्य नाही. वाहकांकडे रिचार्जची सुविधा किंवा ग्रामपंचायत स्तरावर रिचार्ज केंद्र उपलब्ध करून द्यावे. व्यवस्था सुरळीत होईपर्यंत आधार कार्डच्या आधारे सवलत देण्याची सुविधा कायम ठेवावी, अशी मागणी गणेशभक्त कोकणवासीय प्रवासी संघाने केली आहे.

दरम्यान, एनसीएमसी कार्डच्या अंमलबजावणीपूर्वी कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेने केली असून, अडचणी दूर न केल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# औद्योगिक वसाहतीच्या प्रगतीचा अभिमान

## उद्योजकांनी स्व. शंकरराव कोल्हे यांचे स्वप्न साकारले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** कोपरगाव औद्योगिक वसाहतीतील उद्योजक आपल्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणे असून, त्यांच्या प्रगतीसाठी परस्पर सहकार्य आवश्यक आहे. येथील उद्योगांची उत्पादने देशासह परदेशातही निर्यात होत असल्याने औद्योगिक वसाहतीचे नाव देश-विदेशात पोहोचले आहे. उद्योजकांनी स्व. शंकरराव कोल्हे यांनी पाहिलेले औद्योगिक विकासाचे स्वप्न प्रत्यक्षात साकार केले, ही अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन संजीवनी उद्योग समूहाचे मार्गदर्शक बिपीनदादा कोल्हे यांनी केले.



कोपरगाव औद्योगिक सहकारी वसाहतीची ६६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवारी (दि. ३) औद्योगिक वसाहत सभागृहात झाली. अध्यक्षस्थानी संस्थेचे व्हाईस चेअरमन केशवराव भवर होते. प्रारंभी बिपीनदादा कोल्हे यांचा संचालक मंडळ व उपस्थित उद्योजकांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना कोल्हे यांनी नवउद्योजकांना प्रोत्साहन, उद्योगांची वाढ आणि त्यातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधींचे महत्त्व अधोरेखित केले. औद्योगिक वसाहतीतील उत्पादनांना देशांतर्गत तसेच परदेशी बाजारपेठ मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सभेच्या निमित्ताने नवउद्योजक व आदर्श उद्योजकांचा गौरव करण्यात आला. मे. ताराचंद ॲग्रोचे प्रोप्रायटर शरद खरात यांना नवउद्योजक, तर मे. ओम साई स्टील फर्निचरचे प्रोप्रायटर ज्ञानेश्वर शिनगर यांना आदर्श उद्योजक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच मे. युनायटेड ॲग्रो फोजन फुड्स प्रा. लि.चे मॅनेजिंग डायरेक्टर संतोष थोरात यांचाही गौरव करण्यात आला. तिन्ही उद्योजकांना शाल, ट्रॉफी व प्रशस्तिपत्रक देण्यात आले.

सभेचे कामकाज असिस्टंट मॅनेजर एस. डी. लोखंडे यांनी मांडले. विविध विषयांवर चर्चा झाल्यानंतर संचालक पंडीत भारुड यांनी आभार मानले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# ‘मागेल त्याला सौर पंप’ योजनेतून शेतकऱ्यांना दिवसा वीज
# दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने महायुती सरकारचे महत्त्वपूर्ण पाऊल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : महाराष्ट्रामध्ये सक्षम नेतृत्व असेल तर शेतकऱ्यांच्या जीवनात कसा सकारात्मक बदल घडवून आणता येतो, याचे प्रत्यक्ष उदाहरण ‘मागेल त्याला सौर पंप’ योजनेच्या माध्यमातून पाहायला मिळत आहे. शेतकऱ्यांना दिवसा आणि हक्काची वीज मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेली सौर कृषी पंप योजना शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरत आहे, असे प्रतिपादन डॉ. सुजय विखे यांनी केले.

राहाता तालुक्यातील आस्तगाव गावच्या शिवारात एका शेतकऱ्याच्या शेतात बसविण्यात आलेल्या सौर पंपाच्या माध्यमातून सुरू असलेल्या सिंचनाची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी महावितरणचे अधिकारी तसेच शेतकरी उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला गती देण्यात आली. विविध ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारून ग्रीड कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देण्यात आली. त्याचबरोबर एक पाऊल पुढे टाकत ‘मागेल त्याला सौर पंप’ योजना सुरू करण्यात आली. या योजनेमुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज उपलब्ध होत असून, शेतीला मोठी चालना मिळत आहे, असे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

आस्तगाव शिवारातील एका शेतकऱ्याच्या शेतात ५ एचपी क्षमतेचा सौर पंप बसविण्यात आला आहे. या पंपाच्या माध्यमातून जवळपास ५ ते १० एकर क्षेत्र ओलिताखाली आणले जात असून, शेतकऱ्याला दिवसा सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे. या भागाला निळवंडे धरणाचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तत्कालीन जलसंपदा मंत्री तथा विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे जलसंपदा मंत्री तथा राहाता मतदारसंघाचे भाग्यविधाते नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेखही डॉ. विखे पाटील यांनी केला.



सध्या काही भागांमध्ये वीजपुरवठ्याच्या वेळेत होणारे बदल आणि लोडशेडिंगमुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी वीज उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांना शेतात जावे लागते, तर अनियमित वीजपुरवठ्यामुळे पिकांना वेळेवर पाणी देणे अनेकदा कठीण होते. अशा परिस्थितीत ‘मागेल त्याला सौर पंप’ योजना शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. सौर पंपामुळे दिवसा सौर ऊर्जेचा वापर करून शेतकरी आपल्या सोयीनुसार सिंचन करू शकतो. त्यामुळे लोडशेडिंग, रात्रीच्या वीजपुरवठ्याची प्रतीक्षा आणि वीजपुरवठ्याच्या अनिश्चिततेवर मात करून शेतीला वेळेवर पाणी देणे शक्य होत आहे. भविष्यात शेतीसाठी ऊर्जेची गरज भागविण्याच्या दृष्टीने सौर पंप हा शेतकऱ्यांसाठी प्रभावी आणि दीर्घकालीन पर्याय ठरणार आहे.सौर पंपाबाबत काही ठिकाणी गैरसमज आणि अफवा पसरवल्या जात आहेत. सौर पंप केवळ उन्हातच चालतो किंवा ढगाळ वातावरणात काम करत नाही, असा गैरसमज आहे. मात्र आस्तगाव येथे पाहणी केली असता पूर्णपणे ढगाळ वातावरण असतानाही सौर पंप सुरू असल्याचे दिसून आले. त्यावर स्प्रिंकलरच्या माध्यमातून शेतीला पाणी दिले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रत्यक्ष सौर पंपाचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधावा, असे आवाहन डॉ. विखे पाटील यांनी केले. ‘मागेल त्याला सौर पंप’ योजनेत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात शासनाकडून अनुदान मिळत आहे. ३ एचपी पंपासाठी शेतकऱ्यांना साधारण १५ ते २० हजार रुपये, तर ५ एचपी पंपासाठी साधारण ३० ते ३५ हजार रुपये भरावे लागतात. उर्वरित मोठा खर्च राज्य सरकारकडून करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांवरील आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महायुती सरकारचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील तसेच महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे डॉ. विखे यांनी आभार मानले.

दखल

## गोपाळपूरमध्ये मोसंबी उत्पादक शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची बैठक

**राहुरी** :महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील अखिल भारतीय समन्वित फळपिके संशोधन प्रकल्पाच्या मोसंबी उत्पादक शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची बैठक नेवासे तालुक्यातील गोपाळपूर येथे संपन्न झाली. याप्रसंगी प्रकल्पाचे कीटक शास्त्रज्ञ डॉ. रणजीत कडू, रोग शास्त्रज्ञ प्रा. मधुकर शेटे तसेच मोसंबी शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष साहेबराव ताठे उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी विविध पिकांच्या गटानुसार शेतकरी शास्त्रज्ञ मंच स्थापन



करण्यासंदर्भात सूचना केली होती. या अनुषंगाने संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके व उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील तसेच प्रकल्पाच्या प्रभारी अधिकारी डॉ. सुमती दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली गोपाळपूर येथील मोसंबी उत्पादक शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची स्थापना करण्यात आली. यामध्ये प्रा. मधुकर शेटे यांनी विविध रोगांमुळे होणारी मोसंबीची फळगळ व व्यवस्थापन तर डॉ. रणजीत कडू यांनी मोसंबी पिकावर प्रादुर्भाव करणाऱ्या विविध किडी व त्यांचे एकात्मिक व्यवस्थापन या विषयांवर मार्गदर्शन केले. शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमासाठी परिसरातील मोसंबी उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ईपीएस-९५ पेन्शनधारकांचा उद्या बेलापूर येथे मेळावा

**बेलापूर ।** अहिल्यानगर जिल्ह्यातील ईपीएस-९५ पेन्शनधारकांचा मेळावा रविवार, ६ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता संस्कृती मंगल कार्यालय, श्रीरामपूर-बेलापूर रस्ता, बेलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. ईपीएस राष्ट्रीय संघर्ष समिती व पेन्शनर वेल्फेअर असोसिएशन, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी खासदार भाऊसाहेब वाकचौरे राहणार आहेत. कमांडर अशोकराव खरात यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे. मेळाव्यात राष्ट्रीय महासचिव विरेंद्रसिंग राजावत, पश्चिम भारत संघटक सुभाषराव पोखरकर, महाराष्ट्र राज्य समन्वयक अजितकुमार घाडगे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष देविसिंग अण्णा जाधव, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष ईंद्रसिंगअप्पा राजपूत, महाराष्ट्र महिला अध्यक्ष आशाताई शिंदे यांच्यासह पदाधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. जिल्ह्यातील साखर कारखाने, बँका, एमआयडीसी, शेती महामंडळ, एसटी महामंडळ, वीज मंडळ, सूत गिरण्या आदी संस्थांतील ईपीएस-९५ पेन्शनधारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष संपतराव समिंदर व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## लोणीच्या पॉलिटेक्निकमध्ये पाच दिवसीय चर्चासत्राचे आयोजन

**प्रवरानगर** : ऊर्जा संवर्धन, अक्षय ऊर्जेचा प्रभावी वापर आणि पर्यावरण संरक्षणाच्या माध्यमातून शाश्वत विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक), लोणी येथील केमिकल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या प्रायोजकत्वाखाली ‘शाश्वत ऊर्जा तंत्रज्ञान आणि पर्यावरण व्यवस्थापन’ या विषयावर पाच दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम ७ ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत होणार आहे. तंत्रशिक्षण क्षेत्रातील अध्यापकांना या क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान, औद्योगिक पद्धती आणि बदलत्या तांत्रिक प्रवाहांची माहिती मिळावी या उद्देशाने या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या पाच दिवसीय कार्यक्रमात कचऱ्यापासून ऊर्जा पुनर्प्राप्ती, स्वयंचलित सौर पॅनेल स्वच्छता तंत्रज्ञान, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान, ऊर्जा शाश्वततेतील अलीकडील प्रवाह यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.

## साईनगर-पंढरपूर रेल्वे सुरू न केल्याने प्रवासी संघटनेत नाराजी

**श्रीरामपूर ।** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर साईनगर-पंढरपूर रेल्वे सुरू करण्याचे नियोजन रेल्वे प्रशासनाने न केल्याने प्रवासी संघटनेच्या बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. प्रवासी भवन येथे संघटनेची बैठक अध्यक्ष रणजित श्रीगोड यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सहसचिव वैभव गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. बैठकीत रेल्वे व एसटी महामंडळाशी संबंधित विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. दौंड-मनमाड रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण झाल्यानंतर साईनगर-पंढरपूर रेल्वे सुरू ठेवण्याचे आश्वासन देण्यात आले होते. या रेल्वेमुळे राहाता, कोपरगाव, श्रीरामपूर, राहुरी, अहिल्यानगर व श्रीगोंदा परिसरातील वारकऱ्यांची मोठी सोय झाली असती. मात्र, आषाढी एकादशीच्या निमित्तानेही रेल्वे सुरू न केल्याने सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. याबाबत वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांना पत्र पाठविण्यात येणार असल्याचे विठ्ठलराव कर्डिले यांनी सांगितले. याशिवाय हडपसर-बनारस अमृतभारत रेल्वे, म्हैसूर-हरिद्वर, हुबळी-प्रयागराज तसेच पुणे येथे सकाळी ९.३० वाजता पोहोचणारी अहिल्यानगर नावाची रेल्वे सुरू करण्याची मागणी करण्यात आली. एसटी बसमधील दोन रुपयांचा स्वच्छता कर रद्द करावा, नवीन बसेस पुणे मार्गावर द्याव्यात, आदी मागण्यांचे ठराव प्रशासनाकडे पाठविण्याचे ठरले.बैठकीस किशोर फुणगे, प्रकाश कुलथे, अ‍ॅड. अमोल बठीया, रविंद्र शहाणे, चंद्रकांत जोशी, किशोर कुलकर्णी, दत्तात्रय काशिद, किरण घोलप, आर्किटेक्ट प्राची फरगडे, भाऊसाहेब शिंदे आदी उपस्थित होते. अ‍ॅड. अमोल सुरेश बठीया यांची आजीवन सदस्य म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. किशोर कुलकर्णी यांनी आभार मानले.

## प्रवरेची माजी विद्यार्थिनी ऋचा खैरनारची कर सहाय्यक व महसूल सहाय्यक म्हणून निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत लोणी येथील कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी ऋचा राजाराम खैरनार हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत कर सहाय्यक व महसूल सहाय्यक या दोन्ही



पदांसाठी निवड झाली आहे. तिच्या या यशाची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. स्वरांजली गाढे यांनी दिली

ऋचा खैरनार हिने आपल्या मेहनत, सातत्य, नियोजनबद्ध अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिची कर सहाय्यक तसेच महसूल सहाय्यक या दोन्ही पदांसाठी झालेली निवड ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. तिच्या यशामुळे महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही स्पर्धा परीक्षांकडे वळण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे.

## गटकळ स्कूल मध्ये शैक्षणिक दहीहंडी उत्सवात साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : येथील लेट श्री एकनाथ नामदेव गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये नुकतीच जन्माष्टमी निमित्त संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. भाऊसाहेब टेमक व अ‍ॅड. सुरेखा टेमक यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांचे मनोगते झाली तसेच चिमुकल्यांनी नृत्य प्रदर्शन केले सहशिक्षक महेश शिंदे, सुपरवायझर वर्षा मगर यांची भाषणे झाली. त्यानंतर शैक्षणिक दहीहंडी विद्यार्थ्यांनी कौशल्याने आनंदाने फोडली. तदनंतर प्राचार्य भारती कुदळे यांनी जन्माष्टमीचा




उद्देश विशद केला.

दहीहंडी फोडण्यासाठी आपण एकमेकांना सहकार्य करून फोडतो याच्यातून एकमेकांना सहकार्य करण्याची भावना यामुळे वाढीस लागून, एकमेकांच्या सहकार्यातून कार्य सफल व यशस्वी होते हा संदेश यातून मिळत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुनम मॅडम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेच्या प्राचार्या भारती कुदळे सुपरवायझर, वर्षा मगर, माधुरी गटकळ तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# राधिकाची पर्यावरणपूरक संकल्पना शेणापासून श्री गणेशमूर्तींची निर्मिती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी ।** संगमनेर तालुक्यातील दाढ खुर्द येथील राधिका राजेश गव्हाणे यांनी गाईच्या शुद्ध शेणापासून पर्यावरणपूरक व सात्त्विक श्री गणेशमूर्ती तयार करून भक्ती, गोसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संगम साधला आहे. त्यांच्या या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गव्हाणे कुटुंब गेल्या १५ वर्षांपासून गोसेवेत कार्यरत असून ‘राजमाता गोमाता’ संकल्पनेतून गोवरी, औषधी धूपबत्ती, सांब्राणी कप यांसह विविध गोउत्पादने तयार केली जातात. याच माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती



तयार करण्यात येत असून विसर्जनानंतर त्यापासून शेतीस उपयुक्त खत तयार होते. त्यामुळे जलप्रदूषण टाळण्यास मदत होते. या गणेशमूर्तीमध्ये हिरडा, बेहडा, अर्जुन, सताडा आदी औषधी वनस्पतींच्या बियांचा समावेश केला जातो. विसर्जनानंतर या बियांपासून रोपे उगवण्याची संकल्पना असून, ‘बाप्पांचे विसर्जन म्हणजे अंत नव्हे, तर नव्या जीवनाची सुरुवात’ असा संदेश यातून दिला जात आहे.पालकांनी पर्यावरणपूरक मूर्ती खरेदी करून ती आपल्या पाल्याच्या हातून रंगवून घ्यावी, अशी राधिकांची संकल्पना आहे. प्रा. भाऊसाहेब मांढरे यांनी ५० मूर्ती खरेदी करून संगमनेर येथील सर डी. एम. पेटीट हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाटप करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

मुंबईतील वांद्रे व वाशी येथील ‘उमेद’ अभियानाच्या स्टॉलवरही या मूर्तींना प्रतिसाद मिळाला. आतापर्यंत सुमारे ९५० मूर्ती तयार करण्यात आल्या असून ५०० मूर्तींची विक्री झाली आहे. विक्रीतून मिळणारे उत्पन्न दाढ खुर्द व भिवंडी येथील गौशाळांमधील गाईंच्या चारा-पाणी व आरोग्यसेवेसाठी वापरले जाते.

राधिका गव्हाणे यांच्या या उपक्रमाचा सरपंच सतीश जोशी यांनी गावात सत्कार करून शुभेच्छा दिल्या. भक्तीसोबत पर्यावरण संवर्धन आणि गोसेवेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# शेतकऱ्यांच्या पोरांना न्याय !
## विद्यापीठ कंत्राटी सुरक्षा रक्षकांनी मानले



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** महात्मा फुले कृषी विद्यापीठातील सुरक्षा रक्षकांवर लादण्यात आलेली अनावश्यक आणि किचकट भरती प्रक्रिया रद्द करून शेतकऱ्यांच्या पोरांना खऱ्या अर्थाने न्याय मिळवून दिल्याबद्दल सर्व सुरक्षा रक्षकांनी शिवसेना जिल्हाध्यक्ष पै. रावसाहेब पा. खेवरे नाना यांचे जाहीर आभार मानले.

विद्यापीठ प्रशासनाने जुन्या अनुभवी सुरक्षा रक्षकांना डावलून नव्याने ग्राउंड व भरती प्रक्रिया राबवण्याचा घाट घातला होता. मात्र खेवरे नाना यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला धारेवर धरत ही प्रक्रिया तात्काळ रद्द करण्यास भाग पाडले. त्यांच्या या लढ्यामुळे अनेक कुटुंबांचा रोजगार वाचला आहे.

या आभार कार्यक्रमाच्या प्रसंगी सुरक्षा रक्षक सर्पमित्र राहुल गायकवाड, जालिंदर अडसूरे, जयेश पवार, क्षीरसागर यांची प्रेरणादायी भाषणे झाली. त्यांनी खेवरे नाना यांनी आम्हाला फक्त नोकरी नाही तर सन्मान मिळवून दिला, शेतकऱ्यांच्या पोरांच्या पाठीशी ते खंबीरपणे उभे राहिले अशा भावना व्यक्त केल्या.

यावेळी बाळासाहेब हळनोर, शाम घोरपडे, गोरक्षनाथ भालेराव, सतीश माने, संदीप धसाळ, महिला सुरक्षा रक्षक हेमांगी धसाळ यांच्यासह मोठ्या प्रमाणात सुरक्षा रक्षक आणि सुपरवायझर उपस्थित होते.

कामगारांच्या हक्कासाठी शिवसेना सदैव लढत राहील, अशी ग्वाही खेवरे यांनी यावेळी दिली.

# भूमिगत गटार योजनेमुळे रस्त्यांची दुरवस्था गणेशोत्सवापूर्वी खड्डे बुजवा, मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर शहरातील भूमिगत गटार योजनेच्या कामामुळे अनेक रस्त्यांची मोठ्याप्रमाणात दुरवस्था झाली आहे त्यामुळे गणेशोत्सवाच्या पूर्वी शहरातील सर्व रस्त्यांवरील खड्डे नगरपालिका प्रशासनाने तातडीने बुजविण्यात यावे अशी मागणी शिव सेना महायुतीने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदना डरे केली आहे.

संगमनेर शहरात नगरपालिकेच्या वतीने भूमिगत गटारी खोदकाम केल्यामुळे रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले आहे शहरातील सर्वच रस्त्यांची खड्ड्यात रस्ते की रस्त्यात खड्डे असे अवस्था झाली आहे खड्ड्यांमुळे नागरिक व वाहन धारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शाळकरी मुले, वृद्ध नागरिक आणि दुचाकी स्वारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेचा प्रश्न शांतता समितीच्या बैठकीत उपस्थित होऊनही नगरपालिका प्रशासनाकडून कुठल्याही प्रकारची ठोस कार्यवाही झालेली नसल्याची नाराजी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांपुढे व्यक्त करत नगर परिषद प्रशासनाने केवळ प्रसिद्धी न करता गणेशोत्सवापूर्वी शहरातील प्रमुख व अंतर्गत रस्त्यांवरील खड्डे बुजवून भूमिगत गटार योजनेमुळे खराब



झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे निर्देश नगरपालिका प्रशासनाला द्यावेत, अशी मागणी शिवसेना महायुतीचे राहुल भोईर शशांक नामन भोईर गुड्डू इंजिनियर जावेद शेख यांच्यासह शिवसेना महायुतीच्या कार्यकर्त्यांनी केले आहे.

## अवैध दारू धंदे कायमस्वरूपी बंद करा , शेकडो महिलांचे प्रशासनाला निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील चिंचोली येथे सुरु असलेले अवैध दारू धंदे कायम स्वरुपी बंद करण्यासाठी ग्रामपंचायत मार्फत ठराव करण्यात आला. तसेच शेकडो ग्रामस्थांनी एकत्रित येऊन पोलीस व महसूल प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

राहुरी तालुक्यातील चिंचोली येथे अनेक दिवसांपासून राजरोसपणे अवैध गावठी व देशी दारुची राजरोसपणे विक्री चालू आहे. चिंचोली येथील शाळेच्या जवळ अवैध दारू विक्री रात्र-दिवस चालू आहे. त्यामुळे मुलांच्या शिक्षणावर मोठा परिणाम झाला आहे. लहान मुले देखील व्यसनाधीन झाली आहे. दारू पिऊन महिलांची छेड काढली जाते. गावामध्ये टुकार लोकांचे प्रमाण वाढले असून गावामध्ये सर्वत्र दुषित वातावरण तयार झाले आहे.

या बाबत पोलिस प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन संबंधित अवैध धंद्याचा बंदोबस्त करावा. अन्यथा चिंचोली येथील सर्व महिला बेमुदत उपोषण करतील असे निवेदनात म्हटले आहे. तसेच दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी चिंचोली ग्रामपंचायतच्या वतीने दारु बंदीचा ठराव करुन शेकडो महिला पुरुष ग्रामस्थांनी राहुरी पोलीस ठाण्यात जाऊन उप विभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर व पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांना निवेदन देण्यात दिले.

दिलेल्या निवेदनावर सरपंच शोभा लाटे, उज्वला काळे, ज्योती सोनवणे, पुष्पा सोनवणे, ज्योती राऊत, सुवर्णा सोनवणे, कविता बर्डे, ज्योती निकम, मिरा गवळी, माया पवार, सुरेखा देशमाने, छाया भोसले, अनिल बर्डे, सुभाष बेलकर, राजेंद्र सोनवणे, आदित्य सोनवणे, बाजीराव सोनवणे, प्रकाश आरगडे, संतोष दांगट, रामनाथ राजभोज, संदिप काळे आदिंच्या सह्या आहेत.

# दिव्यांग बांधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : दिव्यांग बांधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून, पात्र लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी सदैव प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

दिव्यांग बांधवांना दिव्यांग प्रमाणपत्र मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी कोपरगाव ते सिव्हील हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे जाण्यासाठी मोफत वाहन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेमुळे दिव्यांग व्यक्तींना प्रमाणपत्र काढण्यासाठी ये-जा करण्याचा खर्च व त्रास कमी झाला आहे. आतापर्यंत या उपक्रमाच्या माध्यमातून जवळपास दोन हजार दिव्यांग बंधू-भगिनींना दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून देण्यात आले आहे.

दिव्यांग प्रमाणपत्र उपलब्ध झाल्यानंतर संबंधित लाभार्थ्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेणे सुलभ होत आहे. पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनांची माहिती देऊन त्यांना त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असल्याचे सांगण्यात आले. या उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांना मोठा दिलासा मिळत असून, सामाजिक बांधिलकीतून सुरू असलेल्या या सेवाकार्याचे लाभार्थ्यांकडून स्वागत होत आहे. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते.



द ख ल

## मुख्याध्यापक उंडे बी .आर यांच्या नियुक्तीला मान्यता



**अहिल्यानगर** : जय मल्हार विद्यालय पिंपळगाव रोठा,ता पारनेर या विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक उंडे सर यांना दि.३१ ऑगस्ट २०२६ रोजी नियमित मुख्याध्यापक पदाची मान्यता मिळाल्याबद्दल संस्थेच्यावतीने आज सचिव ड. पांडुरंग गायकवाड यांचे हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सरपंच नानाभाऊ भांबरे, मा.सरपंच बबन पुंडे, किसन मुंढे, पोलीस उपनिरीक्षक बाबाजी जगताप तसेच विद्यालयातील शिक्षक गरकळ सर, केदारी सर,शिक्षक इतर कर्मचारी भगवंत भांबरे,संतोष घुले, नारायण पुंडे, गौरी जगताप, छाया केदारे विद्यालयातील सर्व विद्यार्थी,ग्रामस्थ उपस्थित होते.

## सारसनगरमध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव व संत ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सव उत्साहात



**अहिल्यानगर** : सारसनगर येथील राधाकृष्ण मंदिराच्या वतीने श्रीकृष्ण जन्मोत्सव तसेच संत ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, शिवलीलामृत पारायण, हरिपाठ, भजन, प्रवचन आणि कीर्तन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळ्याचे उद्घाटन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी नगरसेवक प्रकाश भागानगरे, प्रा. माणिक विधाते, ह.भ.प. प्रभाताई भोंग, ज्ञानदेव पांडुळे, अवधूत फुलसौंदर यांच्यासह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. संग्राम जगताप म्हणाले की, महाराष्ट्राची भूमी ही साधुसंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून आपल्याला अध्यात्मिकतेचा मोठा वारसा लाभला आहे. धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आपली संस्कृती आणि परंपरा जोपासली जाते. आजच्या युवा पिढीला धार्मिकतेची गोडी निर्माण व्हावी, यासाठी आपले सण-उत्सव धार्मिक आणि पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरे केले पाहिजेत.

## डीजे ध्वनीप्रदूषणाविरोधात भूमिका घेणाऱ्या विद्यानंद बापट यांच्यावरील हल्ल्याचा निषेध

**अहिल्यानगर** : सार्वजनिक उत्सवामध्ये डीजे व लाऊडस्पीकरमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाविरोधात भूमिका मांडणारे पर्यावरणप्रेमी विद्यानंद बापट यांना पुण्यातील टिळक रोडवरील कशाळे चौकात गुरुवारी (३ सप्टेंबर) बेदम मारहाण झाल्याची घटना घडली.

या घटनेचा हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय रामलाल ललवाणी यांनी तीव्र निषेध केला असून हल्लेखोरावर कठोर कारवाईची मागणी मुख्यमंत्र्यांकडे ई-मेल निवेदनाद्वारे केली आहे. ध्वनीप्रदूषण ही गंभीर सामाजिक व पर्यावरणीय समस्या असून, त्याविरोधात भूमिका मांडणाऱ्या पर्यावरणप्रेमींवर अशा प्रकारे हल्ला होणे अत्यंत निषेधार्ह आहे, असे ललवाणी यांनी म्हटले आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन श्री बापट यांच्यावर हल्ला करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

तसेच संबंधितांना तातडीने योग्य त्या कारवाईच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# योग विद्या धामचा ४१ वा वर्धापन दिन उत्साहात

### एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमाची संधी; तरुण पदवीधरांनी लाभ घेण्याचे उपमहापौर जाधव यांचे आवाहन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : योगविद्याधाम, अहिल्यानगरचा ४१ वा वर्धापन दिन तसेच योगविद्याधाम अहिल्यानगर संचलित सीना योग महाविद्यालयाचे उद्घाटन रविवार, (दि. ३० ऑगस्ट ) रोजी महानगरपालिकेचे उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी योगविद्याधामचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे, संस्थापक सदस्य दत्ता दिकोंडा, जयंत वेसीकर, सुरेश पाटील, रूपेश झंवर यांच्यासह १०० योग शिक्षकांची उपस्थिती होती. अहिल्यानगर शहरामध्ये गेल्या ४१ वर्षांपासून योगविद्याधामच्या माध्यमातून योगविद्येचा सातत्याने प्रचार व प्रसार केला जात आहे. योगाच्या माध्यमातून नागरिकांना निरोगी जीवनशैलीचा मार्ग दाखविण्याबरोबरच योगशिक्षणाचा प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्थेने केले आहे.

संस्थेच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त शिक्षक मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेच्या आजवरच्या कार्याचा आढावा घेत योगशिक्षकांच्या योगदानाचे कौतुक करण्यात आले. दि. ३० ऑगस्ट हा योगमहर्षी स्वामी कुवलयानंद यांचा जन्मदिन आहे. स्वामी कुवलयानंद यांनी लोणावळा येथे सन १९२४ मध्ये कैवल्यधाम या योगसंस्थेची स्थापना करून योगविद्येला शास्त्रीय अधिष्ठान देण्याचे तसेच योगाचा देश-विदेशात प्रचार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेत योगविद्याधामच्या माध्यमातून गेल्या चार दशकांहून अधिक काळ योगशिक्षणाचा प्रसार सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने योगविद्याधामला एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी दिली आहे.

त्यामुळे योगक्षेत्रात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अहिल्यानगरमध्येच एक महत्त्वाची शैक्षणिक संधी उपलब्ध झाली आहे. कोणत्याही शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येणार असल्याने विविध क्षेत्रातील तरुणांना योगशास्त्राचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. यावेळी उपमहापौर धनंजय जाधव यांनी योगविद्याधामशी असलेले आपले कौटुंबिक नाते सांगितले. ते म्हणाले की, माझे वडील कृष्णा जाधव हे त्यावेळच्या नगरपालिकेचे उपाध्यक्ष होते. तसेच ते योगविद्याधामचेही उपाध्यक्ष होते. त्यांनी याच संस्थेत योगाचे शिक्षण घेतले होते. सिद्धीबाग योग हॉलमध्ये ते अखेरपर्यंत योगाभ्यास करत होते. त्यामुळे या संस्थेच्या कार्याचा आणि योगविद्याधामचा मला विशेष अभिमान आहे. योगविद्याधामने ४१ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत योगविद्येचा प्रचार-प्रसार करत अनेक योगशिक्षक घडविले आहेत. बदलत्या जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या विविध समस्या, वाढता ताणतणाव आणि आरोग्यविषयक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर योगाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

अशा परिस्थितीत योगशास्त्राला शैक्षणिक अभ्यासक्रमाची जोड मिळणे ही अहिल्यानगरसाठी निश्चितच महत्त्वाची बाब असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी योगविद्याधामच्या ४१ वर्षांच्या कार्याचा आढावा घेत संस्थेच्या पुढील वाटचालीबाबत माहिती दिली. योगशिक्षण अधिक व्यापक करण्यासाठी तसेच योगशास्त्राला उच्च शिक्षणाची जोड देण्यासाठी सीना योग महाविद्यालयाची सुरुवात करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. वर्धापन दिन आणि सीना योग महाविद्यालयाच्या उद्घाटनामुळे योगविद्याधामच्या कार्याला नव्या शैक्षणिक पर्वाची सुरुवात झाली आहे.

## जिव्हेश्वर शिवालयात श्रावण मास निमित्त रविवारी विविध कार्यक्रम



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : सावेडी येथील गावडे मळा, आर्ट ऑफ लिव्हिंग समोर, पाईप लाईन रोड येथील जिव्हेश्वर शिवालय मंदिरात श्रावण महिन्याच्या निम्मिताने सलग ४ थ्या वर्षी स्व.श्रीनिवास जयकुमार कनोरे यांच्या प्रेरणेने धार्मिक व सामाजिक उपक्रम रविवार, (दि.०६ सप्टेंबर ) रोजी कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती आयोजन वैभव आहेर यांनी दिली.

जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळाच्या या मंदिरात प्रतिवर्षीप्रमाणे पवित्र श्रावण मास निमित्त सकाळी अभिषेक नंतर राधिका ग्रुप (महिला मंडळ) भजन सकाळी १० वा वृक्षारोपण कार्यक्रम सकाळी ११ वा.नंतर आरती व महाप्रसाद दुपारी १२ वा.होणार आहे. यावेळी प्रमुख आकर्षण बाबा बर्फानी अमरनाथ (भव्यदिव्य बर्फाचे शिवलिंग) असणार आहे

महाप्रसाद सुखदेव शेडाळे,मंगल राजेन्द्र शेडाळे,श्रध्दा राजेंद्र शेडाळे,शिवजीत बलभिमराव डोके हे आहेत. विशेष सहकार्य श्रीमती निलिमा कनोरे, मृणाल कनोरे,अध्यक्षा, जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळ,मंदा पिंपरकर,सोमनाथ खाडे,प्रकाश मारवाडे यांचे आहे

यावेळी आ. संग्रामभैय्या जगताप, नगरसेवक संपत बारस्कर,विजय श्रीधर पुंडे ,संजय झिंजे, संदिप दातरंगे, सुनिल त्र्यंबके,सागर मुर्तडकर,डॉ. सागर बोरुडे, चंद्रकांत शेळके , महेश कांबळे ,कुलदिप भिंगारदिवे, अमित खामकर,रोशनी त्र्यंबके,किरणताई बारस्कर,छायाताई राजपुत दिवाणे, स्नेहल कौसल्या,बाबासाहेब गेरंगे उपस्थित राहणार आहे.

स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळ,भगवान श्री जिव्हेश्वर मंदिर(दिल्लीगेट),स्वकुळसाळी महिला मंच,जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान, जिव्हाळा प्रतिष्ठान,माता अंकिनी दशांकिनी महिला मंडळ, नर्मदेश्वर महादेव मंदिर,श्री बेलेश्वर ग्रुप,मनोहर कलेक्शन,कापड बाजार यांचे सहकार्य आहे. सर्व भाविकांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे आवाहन आयोजक श्री व सौ. वैभव संभाजी आहेर व जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळ,सावेडी यांनी केले आहे.

## 'भारत : द इटर्नल'मधून चिरंतन भारताचा वैचारिक प्रवास उलगडणार !

### स्वप्नील खामकर यांच्या पुस्तकाचे रविवारी प्रकाशन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर** : भारतीय संस्कृती, विचारपरंपरा, तत्त्वज्ञान आणि मानवतेच्या सार्वत्रिक दृष्टिकोनाचा व्यापक वेध घेणारे युवा साहित्यिक तथा उद्योजक स्वप्नील खामकर यांच्या 'भारत : द इटर्नल' या सहाव्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. रविदासीया फाऊंडेशन (मुंबई) यांच्यावतीने आयोजित या सोहळ्यात रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, खा. भाऊसाहेब वाकचौरे, आ. संग्राम जगताप व आ. काशिनाथ दाते यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अभ्युदय को-ऑप. बँकेचे माजी अध्यक्ष संदीप घनदाट, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजय कळमकर व अमन आंबेडकर उपस्थित राहणार आहेत.

या प्रकाशन सोहळ्यास साहित्यप्रेमी, विचारवंत आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रविदासीया फाऊंडेशनचे संस्थापक संजय खामकर व प्रदेशाध्यक्ष सुभाष मराठे यांनी केले आहे. 'भारत : द इटर्नल' या पुस्तकातून भारताकडे केवळ भौगोलिक राष्ट्र किंवा प्राचीन संस्कृती म्हणून न पाहता, हजारो वर्षांची वैचारिक, आध्यात्मिक आणि मानवी परंपरा असलेली चिरंतन सभ्यता म्हणून पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारतीय विचारांमधील मानवतावाद, सार्वत्रिकता, अहिंसा, वेदान्ताचा व्यापक दृष्टिकोन, जागतिक शांतता आणि मानवएकतेची संकल्पना यांचा पुस्तकात अभ्यासपूर्ण वेध घेण्यात आला आहे.

भारताच्या ज्ञानपरंपरेने जगाला दिलेल्या विचारांचा आधुनिक जगाशी असलेला संबंध, भारतीय तत्त्वज्ञानातील मानवकेंद्री दृष्टिकोन आणि भविष्यातील जागतिक समाजासाठी भारतीय विचारांचे महत्त्व यावरही पुस्तकातून प्रकाश टाकण्यात आला आहे. 'भारत : द इटर्नल' हे स्वप्नील खामकर यांचे सहावे प्रकाशित पुस्तक आहे. यापूर्वी त्यांची द गेम इज ऑन', 'द सीईओ ऑफ द माइंड', 'झिरो टू लॉन्च', 'लोकनेते सितारामजी घनदाट (जिओग्राफी)' आणि 'द बोरिंग रेव्होल्यूशन' ही पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. स्वप्नील खामकर हे उद्योजक म्हणून कार्यरत आहेत. एप्रिल २०२५ मध्ये स्वप्नील खामकर यांना लंडन येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निमंत्रित करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी' या महत्त्वपूर्ण ग्रंथाला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत शासकीय अधिकारी, तज्ज्ञ, मान्यवर आणि लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते.




खामकर यांचा सहभाग त्यांच्या वैचारिक व सार्वजनिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरला. स्वप्नील खामकर हे महाराष्ट्रातील दुसरे पारंपरिक पद्धतीने प्रकाशित झालेले लेखक असल्याचे नमूद केले जाते.

## आग्रा येथील ऑल इंडिया शालेय कुस्ती स्पर्धेत शौर्य लष्करेची दमदार कामगिरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : आग्रा येथे झालेल्या १७ वर्षीय ऑल इंडिया शालेय कुस्ती स्पर्धेत अहिल्यानगरच्या शौर्य लष्करे यांनी उत्कृष्ट कुस्तीचे प्रदर्शन करत महाराष्ट्राला रौप्यपदक मिळवून दिले. शौर्य लष्करे हे छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्राचे मल्ल असून, त्यांच्या या यशाबद्दल आ. संग्राम जगताप यांच्याकडून कौतुक करण्यात आले. शालेय शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांनी बालपणापासून आपल्या आवडीच्या क्रीडा क्षेत्रात जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे. विद्यार्थ्यांना विविध क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून घडविले जाते. आज विविध क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रातही सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पैलवान शिवाजी चव्हाण यांनी केले. शौर्य लष्करे यांच्या या यशाबद्दल छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्राच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पैलवान शिवाजी चव्हाण, संदीप गायकवाड, शंभू यादव, अतिश ठाकूर, अजित वाघ, पैलवान युवराज चव्हाण, लक्ष्मण धनगर, अमित गाडे, प्रताप गायकवाड आदींसह खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शौर्य लष्करे म्हणाले की, १७ वर्षीय शालेय कुस्ती स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर खेळण्याची संधी मिळाली आणि त्या माध्यमातून यशही संपादन करता आले.


**अश्विन कॉलेज ऑफ फार्मसी-मांची हिल**

आश्वी बु।। ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर-४१३७१४ मो.नं. ७३८७९८६३४२, ९०११२७१२५१

E-Mail- ashvin.cop@gmail.com

Approved by AICTE, PCI, DTE DBATU.

DTE Code: 5479

**बी. फार्मसी** (DSP) **प्रवेश सूचना**

बी. फार्मसीच्या द्वितीय वर्ष CAP राउंडनंतर रिकाम्या राहणाऱ्या जागांसाठी कॉलेज स्तरावरील प्रवेशाकरिता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यप्रणाली | दिनांक |
|---|---|---|
| १. | कॉलेज स्तरावर अर्ज आणि प्रवेश पत्र स्विकारणे. | ०४/०९/२०२६ ते १४/०९/२०२६ |
| २. | अंतिम गुणवत्ता यादी. | १४/०९/२०२६ |
| ३. | प्रवेश घेण्याची अंतिम तारीख. | १५/०९/२०२६ |

**पात्रता :- डी. फार्मसी उत्तीर्ण**

**सचिव**
**एकलव्य अ.भ.वि.जा.ज.व मा.**
**सेवाभावी संस्था मांची हिल, आश्वी बु ।।**


# डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानाच्या सहाव्या आठवड्यात रेल्वे स्टेशन परिसरात जनजागृती

### मनपा आरोग्य केंद्रातील आरोग्य सुविधा व औषधोपचारांचा नागरिकांनी लाभ घ्यावा : आयुक्त यशवंत डांगे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर साथीचे आजार पसरण्याची शक्यता असताना अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाच्यावतीने 'डेंगूमुक्त अहिल्यानगर' साप्ताहिक उपक्रमांतर्गत सहाव्या आठवड्यानिमित्त रेल्वे स्टेशन परिसरात घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी तसेच डेंगू आजाराबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधत डेंगू आजाराची कारणे, घ्यावयाची काळजी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत माहिती जाणून घेतली.



यावेळी आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाने आरोग्य सेवांच्या बाबतीत चांगले काम केल्यामुळे राज्यातील महापालिका क्षेत्रांमध्ये दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळविले आहे. या कामामध्ये सातत्य टिकवून ठेवणे गरजेचे आहे. महापालिकेच्या आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांना विविध आरोग्य सुविधा तसेच औषधोपचार उपलब्ध करून दिले जात आहेत. नागरिअकांनी या सुविधांचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा. पावसाळ्यामध्ये साथीचे आजार मोठ्या प्रमाणात पसरण्याची शक्यता असते. हे आजार रोखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून आणि परिसरापासून स्वच्छतेला सुरुवात करावी, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शहरात डेंगू आजाराबाबत चांगल्या पद्धतीने जनजागृती होत असून, त्यामुळे रुग्णसंख्येत घट झाल्याचे दिसून येत आहे.

नागरिकांचे आरोग्य सदृढ आणि निरोगी राहावे यासाठी महापालिका प्रशासन काम करत असून, नागरिकांच्या घरापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले. या उपक्रमावेळी आयुक्त यशवंत डांगे, माजी उपमहापौर गीतांजली काळे, नगरसेवक मनोज कोतकर, दत्ता गाडळकर, मयूर बांगरे, नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे, शिक्षणाधिकारी जुबेर पठाण, मुख्याध्यापक विजय हिंगे, डॉ. एच. आर. मुजुमदार, प्रशांत जाधव, वृषाली आरु, विनय शेळके, प्रभाग अधिकारी सतीश पुंड, योगेश औटी आदींसह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी नगरसेवक मनोज कोतकर,माजी उपमहापौर गीतांजली काळे ,नगरसेवक मयूर बांगरे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी डेंगू आजाराबाबत पथनाट्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. डेंगू प्रतिबंधासाठी स्वच्छता, पाणीसाठे टाळणे आणि नागरिकांनी घ्यावयाच्या काळजीबाबत विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे जनजागृती केली. डेंगूमुक्त अहिल्यानगरसाठी प्रशासनासोबत नागरिकांचाही सहभाग महत्त्वाचा असून, प्रत्येकाने आपल्या घरापासून स्वच्छतेची सुरुवात करून डेंगू प्रतिबंधाच्या उपाययोजनांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.


**नगर अर्बन मल्टीपल निधी लिमिटेड**

रेजिस्टरेड ऑफिस : C/O अनिल गरदरे, १८३४, गुरुकृपा कॉम्प्लेक्स, राजुरी रोड, कोल्हार बीके, ता. राहाता, जि.अहमदनगर MH 413710

Email Id: Nagarurbanmnl89gmail.comCIN: U67190PN2018PLC178703

८ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम २ (२०) आणि ९१ नुसार आणि कंपनी नियम, २०१४ आणि इतर लागू कायद्यांनुसार सर्व भागधारकांना याद्वारे सूचना देण्यात आली आहे,कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, ३० सप्टेंबर २०२६ सकाळी ११.०० वाजता. नोंदणीकृत कार्यालय C/O अनिल गरदरे, १८३४, गुरुकृपा कॉम्प्लेक्स, राजुरी रोड, कोल्हार बीके, ता. राहाता, जि. अहमदनगर MH 413710 येथे आयोजित केली आहे. त्या मध्ये खालील व्यवहार केले जातील : -सामान्यविषय

a) ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या वर्षासाठी लेखा परीक्षित वित्तीय विवरणे प्राप्तकरणे,संचालकांचा अहवाल आणि त्यावरील लेखा परीक्षकांचा अहवाल विचारात घेणे आणि स्वीकारणे,

b) खालील ठराव एक सामान्य ठराव म्हणून विचारात घेणे आणि योग्यवाटल्यास, बदलांसह किंवा त्याशिवाय पास करणे, निर्धारित केले, श्री. अनिल कर्णसाहेब गरदरे DIN: 08222849, संचालक, जेरोटेशनद्वारे सेवानिवृत्तहोत आहेत आणि पात्र असल्यानेतेस्वतः पुनर्नियुक्ती चा प्रस्ताव देत आहे, त्यांची कंपनीचे संचालक म्हणून पुनर्नियुक्ती केलीजाईल, जे रोटेशन व्दारे निवृत्त होण्यास जबाबदार असतील.

उपरोक्त कलमाचे पालन करून, ज्या भागधारकांचे शेअरहोल्डिंग रु. १०००/- पेक्षा जास्त आहे, त्यांना वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत देण्यात येईल, इतर भागधारकांसाठी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात ती मिळवू शकेल. कंपनी सर्व भागधारकांना विनंती करते की ज्यांनी अद्याप कंपनीकडे त्यांचा ईमेल आयडी नोंदणीकृत/अपडेट केलेला नाही त्यांना ही सार्वजनिक सूचना प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसांच्या आत नोंदणी करावी.

सर्व सभासद/भागधारकांनी सभेला उपस्थित राहावे, ही विनंती. कंपनीच्या वार्षिक अहवालाची प्रत कंपनीच्या नोटिस बोर्ड वर सर्व लावण्यात आली आहे आणि कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात तपासणी केली जाऊ शकते, भागधारकांना वैयक्तिकरित्या किंवा प्रॉक्सीद्वारे मतदान करण्याचा अधिकार आहे.

सभासद/ भागधारकांनी या प्रकरणातील कोणतीही शंका/तक्रारी Nagarurbanmnl89gmail.comB©-'ob आयडीवर पाठवावी.

ठिकाण: कोल्हार
तारीख: ०५/०९/२०२६

संचालक मंडळाच्या आदेशा नुसार
नगर अर्बन मल्टीपल निधी लिमिटेड
**अनिल कर्णसाहेब गरदरे**
**अध्यक्ष**
(DIN 08222849)

**NAGAR URBAN MULTIPLE NIDHI LIMITED**

Regd. off: C/O Anil Gardare, 1834, Gurukrupa Complex, Rajuri Road, Kolhar Bk, Tal Rahata, Dist -Ahmednagar 413710

Email Id: Nagarurbanmnl89@gmail.com CIN: U67190PN2018PLC178703

**NOTICE OF THE 8TH ANNUAL GENERAL MEETING**

Notice is hereby given to all Shareholders in pursuant to Section 2 (20) and 91 of the Companies Act, 2013 and read with Companies Rules, 2014 and other applicable law, the Company would be conducting AGM on Wednesday, 30th September, 2026 at 11.00 A.M. at C/O Anil Gardare, 1834, Gurukrupa Complex, Rajuri Road, Kolhar Bk, Tal Rahata, Dist - Ahmednagar 413710, Physically to transact the business as below:-

ORDINARY BUSINESS:

a) To receive, consider and adopt the Audited Financial Statements for the year ended 31st March 2026, together with the Director's Report and the Auditor's Report thereon.

b) To consider and if thought fit, to pass with or without modification, the following Resolution as an Ordinary Resolution:

"RESOLVED THAT Mr. Anil Karnasaheb Gardare [DIN: 08222849], Director, who retires by rotation and being eligible offers himself for reappointment, be and is hereby reappointed as the Director of the Company, liable to retire by rotation."

In Compliance with aforementioned section, Physical copy of Annual report is hand delivered to the Shareholders who shareholding is more than Rs. 1000/-, The members who do not receive Notice can get the same at the registered office of the Company. The Company requests all the shareholders who have not yet registered /updated their email id with Company to register the same within 3 days from publication of this public notice.

All the members/shareholders are requested to attend the Meeting. The Annual report of the Company can be inspected at the registered office of the company and financial statements with enclosures are affixed in the Notice. The Board of the Company and Shareholders are entitled to vote either in person or through proxy.

Any Query/grievances in this matter may be addressed at E-mail ID Nagarurbanmnl89@gmail.com.

Place: Kolhar
Date: 05/09/2026

By order of the Board
For Nagar Urban Multiple Nidhi Limited
**Anil Karnasaheb Gardare**
**Chairman**
(DIN: 08222849)



**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा) अहमदनगर.**
**अहिल्यानगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन**
**मर्यादित अहिल्यानगर. यांचे कार्यालय**
**दुसरा मजला, व्यापारी संकुल, महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड,**
**ता. जिल्हा अहिल्यानगर. ४१४००१**
**(०२४१)२३२६९१४** ahmednagarfederation@gmail.com

जा.क्र.६३१/सनि (प)/ पतसंस्था/जाहीरनोटीस/कलम १०१/सन-२०२६-२७
दिनांक : ०२/०९/२०२६

**जाहीर नोटीस**

| अ.नं | अर्ज क्र. | जाब देणार | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ३८९ | कर्जदार राऊत रमेश किसन<br>जामिनदार- पाठक संतोष भिमराज<br>जामिनदार- शिंदे रावसाहेब जालिंदर | ५८६६० |
| २ | ३७९ | कर्जदार आकाश अशोक बर्वे<br>जामिनदार- अमोल देवराव गायकवाड<br>जामिनदार- सागर उत्तम मिसाळ | २९४७४ |

ज्याअर्थी अर्जदार संस्था जनलक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, कुकाणा ता. नेवासा जि.अ.नगर यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये जाब देणार यांचे विरुध्द वसुली दाखला मिळणेकामी याकार्यालयात दावा दाखल केला आहे. त्याअनुषंगाने जाब देणार यांना रजिष्टर पोस्टाने नोटीस पाठवूण संधी दिली असता वरील काही जाब देणार दिलेल्या पत्त्यावर आढळून येत नसल्याने अथवा त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने त्यांना पाठविण्यात आलेल्या नोटीसा पोष्टाच्या शे-यासह या कार्यालयाकडे परत आल्या आहेत. तेव्हा अर्जदार पतसंस्थेने जाब देणार यांचे विरुध्द दाखल केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने म्हणणे मांडण्यासाठी नैसर्गिक न्याय तत्वानुसार संधी मिळावी या हेतुने जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ठ अर्जासंबधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वताः जातीने दिनांक १६/०९/२०२६ रोजी सकाळी / दुपारी ०१.०० वाजता अर्जा संबधी कागदपत्रासह आपण सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा) अहिल्यानगर, अहिल्यानगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्यादित अहिल्यानगर, यांचे कार्यालय दुसरा मजला, व्यापारी संकुल, महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, ता. जिल्हा - अहिल्यानगर. या कार्यालयात उपस्थित रहावे. या जाहिर नोटीसी व्दारे वरील जाब देणार यांना असे कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण सुनावणीस वेळेवर हजर न राहील्यास अथवा आपले लेखी / तोंडी म्हणणे सादर न केल्यास आपले काही एक म्हणणे नाही, असे गृहीत धरुन आपल्या गैरहजेरीत आपल्या अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व योग्य तो निर्णय देण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

आज दिनांक : ०२/०९/२०२६ रोजी माझी सही कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर नोटीस दिले आहेत.

स्थळ - अहिल्यानगर
दिनांक ०२/०९/२०२६

**गणेश औटी**
**सहाय्यक निबंधक सहकारी**
**संस्था (परसेवा) अहिल्यानगर.**
**ता.जि.अहिल्यानगर.**

## दखल

### जेजुरीतील काका हलवाई दुकानात चोरी

**जेजुरी :** जेजुरी-सासवड मार्गावरील लवथळेश्वर परिसरातील काका हलवाई स्वीट सेंटरमध्ये शुक्रवारी (दि. ४) पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास चोरीची घटना घडली. दुचाकीवरून आलेल्या तीन अनोळखी व्यक्तींनी दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश केला. त्यानंतर दुकानातील रोख रक्कम व मिठाई चोरीस गेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. काजू बाईट, काजू गजक व काजू चोकोबाईट अशी सुमारे सहा किलो मिठाई तसेच १ लाख ५० हजार रुपये रोख चोरीस गेल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी दुकानमालक अक्षय दत्तात्रय भोईटे यांनी जेजुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. अनोळखी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल असून, प्रभारी अधिकारी रविंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक थोरात तपास करीत आहेत.

### वक्तृत्व स्पर्धेतील सहभागातून व्यक्तिमत्त्व विकासाला चालना– योगेंद्र पवार



**सोमेश्वरनगर –** वडगाव निंबाळकर वक्तृत्व स्पर्धांमध्ये सहभागी झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा बोलण्यातील आत्मविश्वास वाढतो. विचार मांडण्याची क्षमता विकसित होऊन व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होण्यास मदत होते, असे मत विद्या प्रतिष्ठान संस्थेचे खजिनदार योगेंद्र पवार यांनी व्यक्त केले.कोऱ्हाळे बुद्रुक (ता. बारामती) येथील नामदेवराव पाटील सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने कै. वसंतराव पवार यांच्या पुण्यस्मृतिनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन योगेंद्र पवार यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.यावेळी जिल्हा परिषद सदस्य रोहिणी कदम-ढोले, वाचनालयाचे अध्यक्ष सतीश खोमणे, राजेंद्र जगताप, प्रदीप गिते, पंचायत समिती सदस्य जितेंद्र पवार उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तात्रेय भोसले सूत्रसंचालन शैलजा साळवे रघुनाथ शिर्के यांनी आभार मानले.तीन गटात पार पडलेले या स्पर्धेत १६५ स्पर्धकांनी भाग घेतला प्रत्येक गटातील पहिल्या आठ स्पर्धकांना सन्मानचिन्ह रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

### भोरच्या पाणी योजनेसाठी १८ कोटींचा निधी



**भोर :** भोर शहराच्या प्रलंबित व कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजनेसाठी नगरविकास विभागाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. नगराध्यक्ष रामचंद्र आवारे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला तसेच आमदार शंकर मांडेकर यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून हा निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार शंकर मांडेकर यांनी दिली.गेल्या अनेक वर्षांपासून भोर शहरासाठी स्वतंत्र आणि कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याची मागणी नागरिकांकडून होत होती. या योजनेमुळे शहरातील पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यास मदत होणार आहे.मंजूर निधीतून भाटघर धरणाच्या वरच्या बाजूस जॅकवेल, पंप हाऊस, पाणी उपसा विहीर, निरीक्षण विहीर, मुख्य कनेक्टिंग कामे, पोहोच पूल, बंधारा व रस्ता, कच्च्या पाण्याची उपसा यंत्रसामग्री, रायझिंग मेन, आरसीसी ब्रेक प्रेशर टाकी तसेच जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत गुरुत्वाकर्षण वाहिनी उभारण्यात येणार आहे. याशिवाय वितरण प्रणाली, बल्क वॉटर मीटर आणि अन्य आवश्यक कामांचा समावेश आहे.निधी मंजूर झाल्याबद्दल नगराध्यक्ष रामचंद्र आवारे, नगरसेवक केदार देशपांडे, नगरसेवक कुणाल धुमाळ, सोमनाथ ढवळे, प्रमोद महाजन, अमित जाधव, सुखदेव शिंदे, संतोष बारटक्के, बाळा शेटे, अनिल पवार, संतोष सणस, रवि मोहिते, नितीन सोनवणे यांच्यासह पदाधिकारी व नागरिकांनी आमदार शंकर मांडेकर यांचा सत्कार करून आभार मानले.

### कोरेगाव भीमात युवकाची कर्जाच्या आमिषाने फसवणूक

**तळेगाव ढमढेरे, :** कोरेगाव भीमा (ता. शिरुर) येथे एका युवकाला झेनीत फायनान्स कंपनीच्या माध्यमातून कर्जाचे आमिष दाखवत फसवणूक क्ल्याची घटना उघडकीस आल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोरेगाव भीमा (ता. शिरुर) येथील हेमंत ढेरंगे यांच्या मोबाईलवर झेनीत फायनान्स कंपनीच्या वतीने तीन वेगवेगळ्या मोबाईल नंबरवरून फोन आला त्यांनी हेमंत यांना कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवत त्याच्या मोबाईलमध्ये एक ॲप डाऊनलोड करण्यास सांगून काही माहिती घेतली, त्यांनतर दहा दिवसांत पैसे तुमच्या बँक खात्यात जमा होतील असे सांगत फोन कट केला त्यांनतर हेमंत यांच्या बँक खात्यातून वीस हजार रुपये गायब झाले मात्र सदर व्यक्तींशी पुन्हा संपर्क झाला नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने हेमंत दत्तात्रय ढेरंगे (वय ३२ वर्षे रा. कोरेगाव भीमा ता. शिरुर जि. पुणे) यांनी याबाबत शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार शिवाजी चितारे हे करत आहे.

### टाकळी भीमात इसमाची आत्महत्या



**टाकळी भीमा :** येथील तानाजी नारायण पाचर्णे (वय ४२) यांनी शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. याप्रकरणी शिक्रापूर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.तानाजी पाचर्णे हे शेतात गेले होते. काही वेळाने हर्षवर्धन पाचर्णे शेतात गेले असता तानाजी यांनी झाडाला गळफास घेतल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ कुटुंबीयांना माहिती दिली. त्यानंतर नागरिकांनी तानाजी यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.याबाबत ज्ञानेश्वर चंद्रकांत पाचर्णे यांनी शिक्रापूर पोलिस ठाण्यात खबर दिली. त्यानुसार पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, शिक्रापूर पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार अमोल चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

# कल्याण–लातूर महामार्गाला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

## रास्ता रोकोसह उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**घारगाव :** जुन्नर व संगमनेर तालुक्याच्या सीमेवर प्रस्तावित असलेल्या कल्याण–लातूर जनकल्याण महामार्गाला बोटा परिसरातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. या महामार्गामुळे परिसरातील मोठ्या प्रमाणावर बागायती शेतजमिनी बाधित होणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, महामार्गाचा मार्ग बदलावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.



प्रस्तावित महामार्गासाठी जमिनी संपादित झाल्यास अनेक अल्पभूधारक शेतकऱ्यांचे उपजीविकेचे साधनच हिरावले जाणार आहे. शेताकडे जाणारे पारंपरिक रस्ते, विहिरी, पिके आणि शेतीची सलगता बाधित होण्याची मोठी भीती व्यक्त केली जात आहे. यापूर्वीच पुणे–नाशिक महामार्गासाठी परिसरातील जमिनी गेल्या असून, आता पुन्हा नव्या प्रकल्पासाठी जमिनी दिल्यास शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक व सामाजिक नुकसान होईल, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांच्या हरकती जाणून घेतल्यानंतरच पुढील निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या बैठकीस अंकुश कुरकूटे, अजित शेळके, निलेश काळे, गणेश शेळके, योगेश काळे, गणेशराव शेळके, बाजीराव कुरकूटे, संजय जठार, बाळासाहेब शेळके, धनंजय जठार, एकनाथ ढेरंगे यांच्यासह १०० हून अधिक शेतकरी उपस्थित होते.

कल्याण–लातूर महामार्गात अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी जात आहेत. आधीच पुणे–नाशिक महामार्गासाठी जमिनी गेल्याने उपजीविकेचा प्रश्न आहे. शासनाने विकासाच्या नावाखाली आमचे अस्तित्व संपवू नये. महामार्गाऐवजी प्रलंबित पुणे–नाशिक रेल्वे मार्गाला मंजुरी देऊन तो मार्ग त्वरित पूर्ण करावा.

**–निलेश काळे (बाधित शेतकरी)**

प्रशासनाने शेतकऱ्यांच्या हरकती व मागण्यांचा सहानुभूतीने विचार करावा. शेतकऱ्यांचा विरोध डावलून काम पुढे नेल्यास पुणे–नाशिक महामार्गावर माळवाडी येथे ‘रास्ता रोको’ केला जाईल. त्यानंतरही प्रश्न न सुटल्यास आमरण उपोषण करू.

**–गणेश शेळके (शेतकरी)**

# संचमान्यता निकषांविरोधात पुण्यात शिक्षकांचे धरणे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** उच्च माध्यमिक स्तरावरील प्रस्तावित संचमान्यता धोरणातील अन्यायकारक निकष रद्द करून प्रचलित निकषांनुसार संचमान्यता करावी, या मागणीसाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर आणि महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या वतीने शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, पुणे कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

प्रस्तावित संचमान्यता मसुद्यामुळे राज्यातील सुमारे ८ ते १० हजार शिक्षक अतिरिक्त होण्याची शक्यता असून, अनेक पूर्णवेळ शिक्षक अर्धवेळ होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे शिक्षकांची सेवासुरक्षा आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य लक्षात घेऊन शासनाने या धोरणाचा तातडीने फेरआढावा घ्यावा, अशी मागणी शिक्षक मित्र कौस्तुभ गावडे यांनी केली.

प्रस्तावित मसुद्यात ४५ मिनिटांची तासिका ४० मिनिटांची करण्याचा निकष सुचविण्यात आला आहे. तसेच विज्ञान शाखेतील एका बॅचची विद्यार्थीसंख्या २० वरून ३० करण्याचा प्रस्ताव आहे. या बदलांमुळे शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरण्याची शक्यता असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखांसाठी १२० विद्यार्थीसंख्येचा निकष प्रस्तावित करण्यात आला आहे. या निकषामुळे अनेक तुकड्या अनुदानासाठी अपात्र ठरण्याची शक्यता असून, कार्यरत शिक्षकांच्या सेवासुरक्षेचा प्रश्न गंभीर होणार असल्याचे शिक्षकांनी स्पष्ट केले.ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी आणि विलंबामुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहत आहेत. परिणामी कनिष्ठ महाविद्यालयांमधील विद्यार्थीसंख्या कमी होऊन शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरण्याची परिस्थिती निर्माण होत असल्याचा मुद्दाही आंदोलनकर्त्यांनी मांडला.



पुण्यात शिक्षण संचालनालयाच्या कार्यालयासमोर प्रस्तावित संचमान्यता धोरणाविरोधात धरणे आंदोलन करताना शिक्षक

अन्यायकारक संचमान्यता निकष तातडीने रद्द करावेत, प्रस्तावित निकषांचा वस्तुनिष्ठ फेरआढावा घ्यावा, कार्यरत शिक्षकांवर अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि प्रचलित निकषांनुसार पारदर्शक ऑनलाइन संचमान्यता प्रक्रिया राबवावी, अशा मागण्या करण्यात आल्या. मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला.

कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाचे सहसचिव दिलीप शितोळे, कोल्हापूर जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष आण्णासाहेब बागडी, सातारा शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सुनील शिंदे, सांगली जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुरेश भिसे, अभिजीत दुर्गी यांच्यासह महाराष्ट्रातील हजारो शिक्षक आंदोलनात सहभागी झाले.

# शिरूर नगर परिषदेत सत्तेला हादरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरूर :** शिरूर नगर परिषदेत सत्ताधारी ‘शिरूर नगर परिषद गटा’ला मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाच नगरसेवकांनी सत्ताधारी गटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेत नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांना पत्र दिले आहे. या घडामोडीमुळे नगर परिषदेतील सत्तेचे समीकरण पुन्हा बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**राष्ट्रवादीच्या पाच नगरसेवकांची फारकत**




उपनगराध्यक्ष मितेश प्रदीप गादिया, माजी नगराध्यक्ष रवींद्र उर्फ शाम मनोहर ढोबळे, पाणीपुरवठा समितीच्या सभापती डॉ. सुनिता संतोष पोटे, महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती स्वप्नाली योगेश जामदार आणि सदस्या चारुशिला गणेश कोळपकर यांनी सत्ताधारी गटातून मुक्त करण्याची मागणी केली आहे.

डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपने ११ जागा जिंकल्या, तर राष्ट्रवादी काँग्रेसला सात, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला पाच आणि एका अपक्षाला विजय मिळाला. २४ सदस्यीय सभागृहात बहुमतासाठी १२ सदस्यांची आवश्यकता होती. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी पक्षांचे नगरसेवक आणि एका अपक्षाने एकत्र येत १४ जानेवारी २०२६ रोजी ‘शिरूर नगर परिषद गट’ स्थापन करून सत्ता स्थापन केली होती.

सत्तास्थापनेनंतर उपनगराध्यक्षपदासह पाणीपुरवठा आणि महिला व बालकल्याण समित्यांमध्ये शरदचंद्र पवार पक्षाच्या नगरसेवकांना पदे देण्यात आली. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून दोन्ही गटांत मतभेद असल्याची चर्चा होती.

माजी नगराध्यक्ष रवींद्र उर्फ शाम ढोबळे यांनी सत्ताधारी गटाकडून सापत्नभावाची वागणूक मिळत असल्याचा आरोप केला आहे. नगर परिषदेच्या सभा, विकासकामे आणि दैनंदिन काम काजात त्यांच्या गटाच्या मतांची दखल घेतली जात नसल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. कारभारात पारदर्शकतेचा अभाव असून त्यामुळे भ्रष्टाचाराला पोषक वातावरण निर्माण होत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या पाच नगरसेवकांच्या निर्णयामुळे सत्ताधारी गटाचे संख्याबळ अडचणीत येण्याची शक्यता आहे. दरम्यान, ११ नगरसेवक असलेल्या भाजपच्या गोटात या घडामोडींमुळे उत्साहाचे वातावरण आहे. भाजप आणि शरदचंद्र पवार पक्षाचे पाच नगरसेवक एकत्र आल्यास नगर परिषदेत नव्या सत्तासमीकरणाची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे आगामी काळात शिरूर नगर परिषदेतील राजकीय घडामोडींना वेग येण्याची चिन्हे आहेत.

# शिरूरमध्ये २५७ वाहनांवर कारवाई; साडेतीन लाखांचा दंड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरूर :** शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी शिरूर पोलिसांनी विशेष नाकाबंदी मोहीम राबविली. पाबळ फाटा, विद्याधाम चौक आणि सिटी बोरा कॉलेज चौक येथे करण्यात आलेल्या तपासणीत २५७ वाहनचालकांवर कारवाई करून ३ लाख ५९ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला.

उपविभागीय पोलिस अधिकारी रविंद्र भोसले यांच्या उपस्थितीत आणि पोलिस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनचालकांकडे वैध परवाना आहे का, वाहनांना नियमानुसार नंबर प्लेट आहे का, काळ्या काचा आहेत का, तसेच दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास केला जात आहे का, याची तपासणी करण्यात आली.

विनापरवाना वाहन चालविणे, ट्रिपल सीट, फॅन्सी नंबर प्लेट, काळ्या काचा आणि इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. वाहनचालकांनी वैध ड्रायव्हिंग लायसन्स जवळ बाळगावे, दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करावा, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहून नेऊ नयेत आणि वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पोलिसांनी केले.

ही कारवाई पोलिस उपनिरीक्षक शेळके, पोलिस उपनिरीक्षक चव्हाण, पोलिस कर्मचारी राकेश मुळीक, हेड कॉन्स्टेबल राजेंद्र वाघमोडे, हेड कॉन्स्टेबल वाडेकर, पोलिस कर्मचारी सुरवसे, थोरे, शेलार, शेखर झाडबुके, माकर तसेच इतर अधिकारी व अंमलदारांनी केली.

# बारामतीत १६ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू; पोलिसांकडून चौकशी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** भिगवण रोड परिसरातील निवासी इमारतीत राहणाऱ्या १६ वर्षीय विद्यार्थिनीचा गंभीर दुखापतीनंतर उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना ४ सप्टेंबर रोजी पहाटे घडली. या घटनेमुळे बारामती परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

सदर विद्यार्थिनी बारामती येथील एका महाविद्यालयात इयत्ता अकरावी विज्ञान शाखेत शिक्षण घेत होती. सध्या तिच्या परीक्षा सुरू होत्या. पालकांनी पोलिसांना दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, मागील काही दिवसांपासून ती अभ्यास आणि परीक्षेच्या ताणाबाबत चिंतेत असल्याचे सांगत होती.

घटनेच्या वेळी विद्यार्थिनी इमारतीच्या टेरेसवर गेली होती. काही वेळाने ती गंभीर जखमी अवस्थेत आढळून आल्यानंतर पालक व शेजाऱ्यांच्या मदतीने तिला तातडीने वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचार




सुरू असताना पहाटे सुमारे पाच वाजता तिचा मृत्यू झाला. या घटनेबाबत पालक किंवा नातेवाईकांनी सध्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध तक्रार अथवा संशय व्यक्त केलेला नाही. अभ्यास व परीक्षेचा ताण ही प्राथमिक माहिती असली तरी मृत्यूमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

दरम्यान, यापूर्वीही सदर विद्यार्थिनी घरातून निघून गेल्याची नोंद बारामती शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्या प्रकरणातील कागदपत्रे व जबाबांचीही सद्य घटनेच्या अनुषंगाने पडताळणी केली जात आहे.

बारामती शहर पोलीस ठाण्याकडून घटनास्थळाची पाहणी, सीसीटीव्ही फुटेज, वैद्यकीय कागदपत्रे तसेच उपलब्ध डिजिटल माहितीची तपासणी करण्यात येत आहे. पालक, नातेवाईक, मैत्रिणी, सहाध्यायी, शिक्षक आणि संबंधित व्यक्तींचे जबाब नोंदवून घटनेमागील नेमकी वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. तसेच कोणत्याही प्रकारचा दबाव, त्रास किंवा अन्य पार्श्वभूमी होती का, याचीही निष्पक्ष चौकशी केली जात आहे.

या प्रकरणी कायदेशीर प्रक्रियेनुसार अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास बारामती शहर पोलीस ठाण्याकडून सुरू आहे.

**जाहीर आवाहन**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालक सौ. सविता बिपिन दळवी, रा. श्रीरामनगर, कसबा, बारामती, जि. पुणे, श्री. सचिन काशिनाथ खराडे, रा. अंथुर्णे, ता. इंदापूर, जि. पुणे सौ. नयना शैलेंद्र बर्गे, रा. खांडज, ता. बारामती, जि. पुणे, श्री. गोरख बाबुराव खोमणे व श्री. संदिप उत्तम भरणे दोघे ही रा. रा.कोऱ्हाळे खुर्द, ता. बारामती, जि. पुणे यांनी रजिस्टर खरेदीखताने घेतलेली मालकी हक्क व ताबे वहीवाटीची असून सदर मिळकत त्यांनी आमच्या अशिलांकडून विसार रक्कम रोख व चेक स्वरुपात स्विकारुन आमचे अशिलांना खरेदी देण्याचे निश्चित केलेले आहे. तसेच सदर मिळकत पुर्णतः निर्वेद्य, निजोखमी असलेचा संपुर्ण भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचा कसल्याही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, गहाण, दान, कर्ज, लिज, लिन, चोळीबांगडी, खरेदीखत, साठेखत, विसारपावती, कोर्टकेस, ताबा, वहिवाट अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस जाहीर झाल्यापासून ८ दिवसाच्या आत मुळ कागदपत्रानिशी खालील पत्त्यावर समक्ष भेटून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचेही कसलीही तक्रार अगर हरकत चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट :- तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका बारामती तसेच मे. दुय्यम निबंधक सो. बारामती यांचे कक्षेतील नगर परिषद वाढीव हद्दीतील गाव जळोची, ता. बारामती, जि. पुणे येथील बागायत शेत जमिन मिळकत गट नं. २३५/९ यांसी क्षेत्र ०० हे. ४० आर. यांसी आकार ०० रु. ३९ पै. यापैकी विद्यमान मालक सौ. सविता बिपिन दळवी, श्री. सचिन काशिनाथ खराडे, सौ. नयना शैलेंद्र बर्गे, श्री. गोरख बाबुराव खोमणे व श्री. संदिप उत्तम भरणे यांच्या मालकी हक्काचे क्षेत्र ०० हे. १२.५० आर. बागायत शेत जमिन. यांसी चतुःसिमा – मुळ सरकारी रेकॉर्ड प्रमाणे ही संपुर्ण बागायत शेत जमिन मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय असे.

ॲडव्होकेट
ॲड. अमोल गुलाबराव सातकर
ऑफिस- शॉप नं. ८, संघवी हाईटस्, कोर्टाशेजारी, भिगवण रोड, बारामती, ता. बारामती, जि. पुणे
मो. ९९२२९७०१२७

स्थळ- बारामती
दिनांक -०४/०९/२०२६

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांना कळविण्यात येते की श्री संतोष पंढरीनाथ जाधव हे गट नं ४२०/२, प्लॉट नं ७ क्षेत्र ०२ आर बांधकामासहित मौजे पिंपळे जगताप, तालुका शिरूर पुणे येथील मालक आहेत. श्री संतोष पंढरीनाथ जाधव घोषित करतात की वरील मिळकत शंकर कोंडाजी कदम यांच्याकडून दिनांक १८/२/२०२२, द. नि. तळेगाव ढमढेरे, दस्त क्र. १३९६/२०२२ च्या खरेदीखताद्वारे खरेदी केलेली आहे. पूर्वी चा दस्त अतुल ज्ञानेश्वर बोत्रे यांच्या नावे शंकर कोंडाजी कदम यांनी अंमलात आणलेली मूळ करारनामा दि. १९/७/२०२१ द. नि. तळेगाव ढमढेरे, दस्त क्र. ५३९०/२०२१ अनुक्रमणिका ॥ आणि रेजिस्ट्रेशन पावती व कुलमुख्यातर पत्र दिनांक दि. १९/७/२०२१ द. नि. तळेगाव ढमढेरे, दस्त क्र. ५३९१/२०२१ आणि रेजिस्ट्रेशन पावती हरवली आहे. श्री संतोष पंढरीनाथ जाधव यांनी या मालमत्तेचे स्पष्ट आणि विक्रीयोग्य शीर्षक असल्याचे आश्वासन दिले आहे. आता माझे क्लायंट वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड मधून कर्ज घेण्याचा विचार करत आहे आणि जर कोणतीही व्यक्ती, बँक संस्था किंवा प्राधिकरणाकडे कोणताही दावा, आक्षेप किंवा व्याज असेल किंवा वरील मूळ हरवलेली कागदपत्रे असतील तर त्यांनी मला खालील पत्त्यावर सात दिवसांच्या आत कळवावे.

**Adv. Vanashree G Kshirsagar**
VASTU HOUSING FINANCE CORP LTD,
OFFICE NO. 603 C AND 604 D, BUILDING VANTAGE 21, SR.NO. 133, PIMPLE SAUDAGAR, PUNE-411027 Mob. 9823598801,
Email - vanashree.kshirsagar@vastuhfc.com

दिनांक: 05/09/2026

# पारनेर तालुक्याच्या उत्तर भागात विजेचा खेळखंडोबा

## पळशी, वनकुटे, पोखरी परिसरातील शेतकऱ्यांचे खडकवाडी सबस्टेशनवर धरणे आंदोलन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोज** : पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील पळशी, वनकुटे, खडकवाडी, कामटवाडी, पोखरी, वारणवाडी, देसवडे परिसरातील शेतकरी गेल्या आठ दिवसांपासून महावितरणच्या अनियमित वीजपुरवठ्यामुळे त्रस्त झाले आहेत. त्यातच गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.



शेतीपिकांना पाणी देण्यासाठी वीजपुरवठा अत्यावश्यक असताना वारंवार वीज खंडित होत असल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी शुक्रवारी (दि. ४ सप्टेंबर) खडकवाडी येथील महावितरणच्या सबस्टेशनवर धरणे आंदोलन सुरू केले. या भागातील शेतांमध्ये बाजरी, मूग, वाटाणा, कांदा यासह विविध पिके घेतलेली आहेत. पावसाअभावी ही पिके आधीच संकटात सापडली असून आता वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे त्यांची अवस्था आणखी बिकट झाली आहे.

पिकांना वेळेत पाणी मिळाले नाही तर हातातोंडाशी आलेले उत्पादन वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या परिसरातील वीजपुरवठा पूर्ण दाबाने होत नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. कमी दाबाचा वीजपुरवठा, वारंवार वीज खंडित होणे तसेच अनियमित वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेतीसाठी पाण्याची गरज असताना वीज उपलब्ध होत नसल्याने पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे.

दरम्यान, आंदोलनस्थळी संपत जाधव, गणेश शिंदे, विलास तांबे, रवींद्र गागरे, विठ्ठल सुडके, महेंद्र झावरे, संजय शिंदे, गणेश सारबंदे, अशोक शिंदे, गोविंद गागरे, शुभम गागरे, हरीओम शिंदे, सतीश शिंदे, शुभम सारबंदे, विलास सागर, बाळू आग्रे, पप्पू मोढवे, जालिंदर बारवे, विजय बिलबिले, सचिन डुकरे, आकाश बिलबिले, किशोर पिंगळे, तुकाराम बिलबिले, मच्छिंद्र शिंदे, संकेत सरोदे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> उत्तर भागातील वीजपुरवठ्याचा अक्षरशः खेळखंडोबा झाला आहे. पाऊस नसल्याने पिके आधीच अडचणीत आहेत. बाजरी, मूग, वाटाणा आणि कांदा वाचविण्यासाठी पाणी देणे गरजेचे आहे; मात्र कमी दाबाचा वीजपुरवठा व वारंवार खंडित होणाऱ्या विजेमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. महावितरणने तातडीने दखल घेऊन पूर्ण दाबाने वीजपुरवठा सुरळीत करावा.
>
> **संपत जाधव (पळशी)**

### दुपारपर्यंत अधिकारी आंदोलनस्थळी फिरकले नाहीत

शेतकऱ्यांनी खडकवाडी सबस्टेशनवर सकाळपासून धरणे आंदोलन सुरू केले. मात्र, दुपारपर्यंत महावितरणचा कोणताही अधिकारी आंदोलनस्थळी फिरकला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी अधिकच वाढली. आपल्या समस्या ऐकून घेण्यासाठी आणि वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

# 'तालीम संस्कृतीची परंपरा जपत नव्या मल्लांना घडविण्याचे काम कौतुकास्पद : उपसरपंच जाधव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : नगर तालुका तालीम सेवा संघाच्या अध्यक्षपदी पै. नाना डोंगरे यांची फेरनिवड झाल्याबद्दल निमगाव वाघा ग्रामपंचायतीच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. ग्रामसभेत पै. डोंगरे यांच्या फेरनिवडीबद्दल अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. त्यांच्या माध्यमातून तालुक्यातील कुस्ती क्षेत्राला सातत्याने मिळत असलेल्या प्रोत्साहनाचे ग्रामस्थांनी कौतुक केले. यावेळी उपसरपंच किरण जाधव, ग्रामविकास अधिकारी प्रविण पानसंबळ आणि केंद्रप्रमुख अतुल काकडे यांच्या हस्ते पै. नाना डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अनिल डोंगरे, सागर कापसे, सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, वसंत फलके, गणेश येणारे, राजू जाधव, पिंटू जाधव आदी उपस्थित होते. पै. डोंगरे यांचा साहेबराव बोडखे मित्र मंडळाच्या वतीनेही सत्कार करण्यात आला.



यावेळी भागचंद जाधव, साहेबराव बोडखे, भाऊसाहेब जाधव, भरत बोडखे, प्रमोद जाधव, प्रशांत जाधव, आनंद गावडे आदी उपस्थित होते. नगर तालुका तालीम सेवा संघाच्या माध्यमातून तालुक्यातील कुस्ती क्षेत्राला सातत्याने प्रोत्साहन देण्याचे काम केले जात आहे. संघाच्या वतीने विविध कुस्ती स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्याचबरोबर विविध स्पर्धांसाठी खेळाडूंच्या निवड चाचण्या घेऊन गुणवंत मल्लांची निवड केली जाते. निवड झालेल्या खेळाडूंना पुढील स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी संघाच्या माध्यमातून आवश्यक सहकार्य व प्रोत्साहन दिले जाते. ग्रामीण भागात अनेक होतकरू आणि गुणवान कुस्तीपटू आहेत. मात्र, आर्थिक अडचणी, योग्य मार्गदर्शनाचा अभाव, स्पर्धेचा पुरेसा अनुभव आणि योग्य व्यासपीठ न मिळाल्याने अनेक मल्लांच्या गुणवत्तेला अपेक्षित संधी मिळत नाही. ही बाब लक्षात घेऊन नगर तालुका तालीम सेवा संघाच्या माध्यमातून नवोदित मल्लांना संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात असल्याची भावना पै. नाना डोंगरे यांनी व्यक्त केली. उपसरपंच किरण जाधव म्हणाले की, पै. नाना डोंगरे यांची नगर तालुका तालीम सेवा संघाच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा फेरनिवड होणे ही निमगाव वाघासह संपूर्ण नगर तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे.

डोंगरे यांनी केवळ कुस्ती क्षेत्रात काम केले नाही, तर ग्रामीण भागातील अनेक होतकरू मल्लांना प्रोत्साहन देऊन त्यांना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळवून दिली आहे. साहेबराव बोडखे म्हणाले की, कुस्ती क्षेत्रासाठी सातत्याने काम करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी उभे राहणे ही आपली जबाबदारी आहे. पै. नाना डोंगरे नगर तालुका तालीम सेवा संघाच्या माध्यमातून करत असल्याचे त्यांनी कौतुक केले.

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीच्या आरोपांची चौकशी करून संस्थेवर प्रशासक नेमा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी शहर** : साकेगाव येथील हुतात्मा बाबू गेनू शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीसंदर्भात करण्यात आलेल्या विविध आरोपांची सखोल व निष्पक्ष चौकशी करून संस्थेवर प्रशासक नियुक्त करावा, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पाथर्डी तालुका उपाध्यक्ष लक्ष्मण डांगे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. डांगे यांच्या मुलीच्या गुणपत्रिकेवर शैक्षणिक वर्ष नमूद नसणे, मुख्याध्यापकांची स्वाक्षरी नसणे तसेच विद्यार्थिनीच्या नावातील अक्षरांमध्ये कथित चुका झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे दोन स्वतंत्र तक्रारी दाखल केल्याचे तसेच संबंधितांवर कारवाईच्या मागणीसाठी उपोषण केल्याचे डांगे यांनी निवेदनात नमूद केले आहे.



तक्रारींची दखल घेत जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयाने चौकशी समिती नियुक्त केली होती. चौकशीत मुख्याध्यापकांच्या कर्तव्यात निष्काळजीपणा अथवा चूक झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्याबाबत संस्थेला पत्र देण्यात आल्याचा दावा डांगे यांनी केला आहे. मात्र, संस्थेकडून अपेक्षित कारवाई झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला. चौकशी समितीचा अहवाल अद्याप आपल्याला मिळालेला नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. केवळ एका विद्यार्थिनीच्या प्रकरणापुरती चौकशी मर्यादित न ठेवता संस्थेच्या एकूण कारभाराचीही सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात केली आहे. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या बोर्ड परीक्षेतील माध्यमाबाबत कथित त्रुटी, न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असताना शिक्षक भरती झाल्याचा आरोप, प्रयोगशाळा व ग्रंथालयांच्या सुविधांबाबत सादर करण्यात आलेल्या माहितीची सत्यता तसेच शाळेतील शौचालये आणि क्रीडांगणांच्या सुविधांची स्थिती याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. संस्थेतील काही कर्मचारी हे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे नातेवाईक असल्याने त्यांना कथितपणे संरक्षण मिळत आहे. या सर्व बाबींची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी डांगे यांनी केली आहे.

संबंधित मुख्याध्यापक, शिक्षक तसेच संस्थेच्या कारभाराबाबत १५ सप्टेंबर २०२६पर्यंत नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अन्यथा १६ सप्टेंबरपासून शिक्षणमंत्र्यांच्या कार्यालयासमोर आपल्या मुलीसह आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. तसेच संस्थेच्या कारभाराबाबत धर्मादाय आयुक्तांकडेही तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे. या प्रकरणातील आरोपांची प्रशासनाकडून निष्पक्ष चौकशी झाल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता जिल्हा प्रशासन या निवेदनाची दखल घेऊन कोणती भूमिका घेते, याकडे साकेगावसह पाथर्डी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# देवस्थान ही आपल्या श्रद्धेची केंद्रे : आ. दाते

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोज** : धार्मिक श्रद्धा आणि विकासकामांचा सुंदर संगम घडवत तिर्थक्षेत्र विकास निधी अंतर्गत खातगाव टाकळी येथील गोरक्षनाथ मंदिराच्या २५ लक्ष रुपये निधीतून सभामंडपाचे लोकार्पण पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या सभामंडपामुळे मंदिरातील धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन, प्रवचन तसेच विविध सामाजिक उपक्रमांसाठी ग्रामस्थांना चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे. यावेळी बोलताना आ. काशिनाथ दाते सर म्हणाले, देवस्थान ही आपल्या श्रद्धेची केंद्रे असण्याबरोबरच गावच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. गोरक्षनाथ मंदिराच्या सभामंडपामुळे ग्रामस्थांची अनेक वर्षांची गरज पूर्ण झाली आहे.

या परिसरातील धार्मिक परंपरा जपत विकासकामांना चालना देणे, हीच आपली भूमिका आहे. मतदारसंघाचा विकास हा केवळ एका गावापुरता मर्यादित न राहता प्रत्येक गावाच्या गरजेनुसार झाला पाहिजे. रस्ते, पाणी, सिंचन, मंदिर परिसर, सभामंडप, मूलभूत सुविधा अशा विविध कामांना शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देत अनेक कामे सुरू आहेत, तर काही कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत.

दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना पाण्याचा शाश्वत आधार मिळावा, यासाठी उपसा सिंचन योजनांसह मोठ्या जलप्रकल्पांच्या पाठपुराव्यालाही प्राधान्य दिले जात आहे, असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, विकासकामे करताना गावागावातील नागरिकांच्या मागण्या आणि स्थानिक गरजा लक्षात घेतल्या जात आहेत. धार्मिक स्थळांचा विकास असो, ग्रामीण रस्त्यांचा प्रश्न असो किंवा सिंचन व पाणीप्रश्न-प्रत्येक विषय शासनदरबारी मांडून तो मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. भविष्यातही खातगाव टाकळीसह संपूर्ण मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध आहोत.

यावेळी बापु सोनवणे, सरपंच सौ. रुथा वैराळ, उपसरपंच धीरज कुलट, ह.भ.प. आदिनाथ कुलट गुरुजी, ह.भ.प. सर्जेराव जपे गुरुजी, मिटूशेठ कुलट, ज्ञानेश्वर पठारे, नवनाथ ताकपेरे, उत्तमराव कुलट, सुदर्शन कुलट, सुनील कुलट, सोपान पठारे, अतुल कुलट, अमित सातपुते, रमेश कुलट, बबन सातपुते, आबासाहेब कुलट, रंगनाथ कुलट, छबुराव काडेकर, श्रीकांत कर्डिले साहेब आदी मान्यवरांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वासुंदे सोसायटीच्या चेअरमनपदी सौ.निर्मला बर्वे यांची निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर** : वासुंदे येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी निर्मला पोपट बर्वे यांची तर व्हा. चेअरमनपदी बाबाजी ठकाजी ठुबे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मा.उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या निवडी करण्यात आल्या. सोसायटीच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच एका महिला सदस्याला चेअरमनपदाची संधी मिळाल्याने गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे.या निवडीमुळे संस्थेच्या प्रगतीला नवी दिशा आणि वेग मिळेल असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. निवडणूक बिनविरोध पार पडल्यानंतर जिल्हा परिषदेच्या मा.सदस्या श्रीम.सुप्रियाताई वसंतराव झावरे पा.व सुजित झावरे पा.यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी सांगितले की, सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी आणि ग्रामस्थांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन संस्थेचा कारभार अत्यंत पारदर्शक आणि गतिमान ठेवावा. सत्काराला उत्तर देताना नवनिर्वाचित चेअरमन व व्हा.चेअरमन यांनी सर्व मार्गदर्शक,संचालक व ग्रामस्थांचे आभार मानले आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अधिक ताकदीने काम करण्याचे आश्वासन दिले. यावेळी सूर्यभान भालेकर,लक्ष्मण झावरे,नारायण झावरे,शंकर बर्वे,बाळासाहेब झावरे,दिलीप पाटोळे, स्वप्निल झावरे,बापूसाहेब गायखे,चेतन बर्वे,पांडुरंग टोपले,पोपटराव बर्वे,सचिव आर.के.भांड यांच्यासह संचालक मंडळ आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



# सरपंच, प्रशासक यांची मुदत संपली... गावगाडा कोण हाकणार ?

## ९४ पैकी तब्बल ७० ग्रामपंचायती प्रशासकांच्या हाती, निवडणुका लांबणीवर, प्रशासक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

**दादा सोनवणे | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील ग्रामीण प्रशासन सध्या अभूतपूर्व अनिश्चिततेच्या भोवऱ्यात सापडले आहे. तालुक्यातील एकूण ९४ ग्रामपंचायतींपैकी तब्बल ७० ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकांच्या हाती आहे. लोकनियुक्त सरपंच व सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली; मात्र आता पुन्हा प्रशासकांची मुदत वाढणार की थेट ग्रामपंचायत निवडणुका होणार? या प्रश्नाने गावोगावी संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मतदार यादीच्या एसआयआर अर्थात विशेष पुनरीक्षण प्रक्रियेमुळे ग्रामपंचायत निवडणुकांचा कार्यक्रम लांबणीवर पडल्याची चर्चा आहे.

परिणामी, लोकनियुक्त प्रतिनिधी नाहीत आणि प्रशासकीय व्यवस्थेचे पुढे काय होणार, याबाबतही ठोस स्पष्टता नाही. त्यामुळे मुदत संपली, आता गावगाडा नेमका कोण हाकणार? हा प्रश्न आता थेट जनतेच्या तोंडी आला आहे.श्रीगोंदा तालुक्यातील अजनूज, अनगरे, आढळगाव, उक्कडगाव, उख्खलगाव, एरंडोली, कामठी, कोकणगाव, कोथूळ, कोंडगव्हाण, कोसेगव्हण, खांडगाव, कोरेगाव, कोरेगव्हाण, कौठा, गव्हाणेवाडी, गार, घारगाव, घुगलवडगाव, घोडेगाव, घोटवी, चांडगाव, चांभुर्डी, चिखली, चिखलटणवाडी, चिंभळा, चोराचीवाडी, टाकळी कडेवळीत, ढवळगाव, ढोरजा, देऊळगाव, दानेवाडी, निंबवी, निमगाव खलू, पिंपरी कोलंदर, पिसोरेखांड, बाबुर्डी, बांगर्डे, बेलवंडी कोठार, बोरी, भानगाव, म्हसे, म्हातारा पिंपरी, मांडवगण, मुंगूसगाव, येवती, येळपणे, राजापूर, रायगव्हाण, रुईखेल, लिंपणगाव, वडाळी, वांगदरी, शिरसगाव बोडखा, शेडगाव, सांगवी दुमाला, सारोळा सोमवंशी, सुरेगाव, सुरोडी, हंगेवाडी, हिंगणी दुमाला, हिरडगाव, महांडुळवाडी, भावडी, आर्वी, जंगलेवाडी, जोशी वस्ती आणि मुंडेकरवाडी या ग्रामपंचायतींवर सध्या प्रशासक कार्यरत आहेत.

### प्रशासक की निवडणूक? 'तारीख पे तारीख'मध्ये अडकला गावांचा विकास

सध्या तालुक्यात प्रशासक व्यवस्था कायम राहणार की ग्रामपंचायत निवडणुका होणार, याबाबत विविध शंका-कुशंका व्यक्त केल्या जात आहेत. त्यातच न्यायालयीन प्रक्रियेत सातत्याने 'तारीख पे तारीख' सुरू असल्याने या प्रश्नाचा अंतिम निकाल नेमका कधी लागणार, असा सवाल ग्रामीण भागातून उपस्थित केला जात आहे.या प्रशासकीय आणि न्यायालयीन अनिश्चिततेचा थेट फटका गावांच्या विकासाला बसत आहे. अनेक ग्रामपंचायतींमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, गटारे, अंतर्गत रस्ते, स्वच्छता, सार्वजनिक सुविधा आणि इतर मूलभूत कामे रखडल्याचे चित्र आहे. अनेक नागरिक आजही आवश्यक सुविधांपासून वंचित असून, निर्णयाच्या विलंबाची किंमत सर्वसामान्य ग्रामस्थांना मोजावी लागत आहे.

### कोट्यवधींचा निधी, पण विकासकामांना 'ब्रेक'

१५ व्या वित्त आयोगासह विविध योजनांतून ग्रामपंचायतींकडे मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध आहे. मात्र प्रशासकांच्या अधिकारांवरील मर्यादा आणि निर्णय प्रक्रियेतील अनिश्चिततेमुळे अनेक ठिकाणी हा निधी अपेक्षित गतीने विकासकामांसाठी वापरला जात नसल्याची चर्चा आहे. प्रशासकांना दैनंदिन व अत्यावश्यक कामकाजापुरते मर्यादित अधिकार असल्याने मोठ्या विकासकामांबाबत निर्णय घेण्यास अडचणी निर्माण होत आहेत. परिणामी, निधी आहे... योजना आहेत... कामांची गरजही आहे... पण निर्णयाचा 'ग्रीन सिग्नल' नाही! अशी परिस्थिती अनेक गावांमध्ये निर्माण झाली आहे.जिल्हा नियोजन समिती तसेच विविध शासकीय योजनांतून मंजूर झालेली कामेही या परिस्थितीमुळे रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. निधी वेळेत खर्च न झाल्यास त्याचा फटका थेट ग्रामीण विकासाला बसण्याची भीती व्यक्त होत आहे.

### गावाला प्रशासक नको की लोकप्रतिनिधी?

आता सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या ७० ग्रामपंचायतींचा पुढील कारभार नेमका कोणाच्या हाती जाणार? शासन नव्याने शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करणार का? विद्यमान प्रशासक व्यवस्थेलाच मुदतवाढ मिळणार का? की निवडणुका जाहीर करून गावचा कारभार पुन्हा सरपंच आणि सदस्यांच्या हाती दिला जाणार ?या प्रश्नाचे उत्तर मिळत नसल्याने ग्रामपंचायत स्तरावरील संभ्रम दिवसेंदिवस वाढत आहे. गावचा कारभार लोकनियुक्त प्रतिनिधींच्या माध्यमातून चालणे ही ग्रामस्वराज्याची मूलभूत संकल्पना असताना दीर्घकाळ प्रशासकीय व्यवस्थेवर अवलंबून राहावे लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

### मूलभूत सुविधांसाठी गावकऱ्यांची प्रतीक्षा

या सर्व प्रशासकीय पेचात सर्वाधिक भरडला जात आहे तो सर्वसामान्य ग्रामीण नागरिक. अनेक ठिकाणी पाणी, रस्ते, गटारे, स्वच्छता आणि सार्वजनिक सुविधांबाबत नागरिकांच्या समस्या कायम आहेत. कामांची मागणी करूनही निर्णय होत नाही, निर्णयासाठी पाठपुरावा करूनही प्रक्रिया पुढे सरकत नाही आणि गावकरी मात्र 'कधी होणार?' या एका प्रश्नाच्या प्रतीक्षेत आहेत.जनमानसातून आता स्पष्ट मागणी पुढे येत आहेप्रशासक ठेवायचे असतील तर विकासकामांसाठी आवश्यक अधिकार द्या; आणि निवडणुका घ्यायच्या असतील तर त्या तातडीने जाहीर करा. मात्र प्रशासकीय आणि न्यायालयीन पेचात गावांचा विकास वेठीस धरू नका!

### तातडीच्या निर्णयाची मागणी

ग्रामपंचायत ही ग्रामीण विकासाची सर्वात महत्त्वाची लोकशाही संस्था आहे. त्यामुळे प्रशासक व्यवस्था ही कायमस्वरूपी पर्याय नसून तात्पुरती व्यवस्था असली पाहिजे, अशी भूमिका नागरिकांमधून व्यक्त होत आहे. सध्याची अनिश्चितता जितकी लांबेल तितका विकासाचा अनुशेष वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासक व्यवस्था, ग्रामपंचायत निवडणुका आणि त्यासंदर्भातील न्यायालयीन प्रक्रियेबाबत लवकरात लवकर स्पष्ट व अंतिम निर्णय घ्यावा, अशी मागणी आता श्रीगोंदा तालुक्यातील ग्रामीण भागातून जोर धरू लागली आहे.कारण हा प्रश्न फक्त सत्तेचा नाही... हा प्रश्न श्रीगोंदा तालुक्यातील ७० गावांच्या विकासाचा आहे.

## द•ख•ल

# शेवगाव - पाथर्डी विधानसभा मतदार संघातील ४१ हजार २९३ मतदार वगळले

**हातगाव** : निवडणूक आयोगाने संपूर्ण राज्यात मतदार यादी विशेष सखोल पुनर्नरीक्षण मोहीम राबवली असून या मोहिमेअंतर्गत २२२ शेवगाव पाथर्डी विधानसभा मतदार संघात मयत, अनुपस्थित, कायमस्वरूपी स्थलांतरित, स्थलांतरित तसेच दुबार नोंदी याची सखोल चौकशी करून पडताळणी केली असल्याने ४१ हजार २९३ मतदारांची नावे मतदान यादीतून वगळली आहेत.अशी माहिती मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी तथा प्रांताधिकारी प्रसाद मते,सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा पाथर्डीचे तहसीलदार डॉ उध्दव नाईक,शेवगावचे तहसीलदार आकाश दहाडदे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार शेवगाव - पाथर्डी या विधानसभेच्या दोन्हीही तालुक्यात मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण ( एसआयआर) मोहीम हाती घेण्यात आली असता निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ठरवून दिलेल्या वेळेत मतदान केन्द्र अधिकारी व सहाय्यक मतदान केंद्र अधिकारी यांच्यामार्फत सदरची मोहीम युद्ध पातळीवर राबवण्यात आली असून पूर्ण करण्यात आली आहे. या संपूर्ण कामाची प्रारूप यादी प्रसिद्ध करण्यात आली असून प्रत्येक नागरिकांनी आपल्या नावाची मतदार यादीची खात्री करून ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २६ पर्यंत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार आहेत. तसेच मतदार नवीन नाव समाविष्ट करण्यासाठी फॉर्म क्र. ६ ,वगळण्यासाठी फॉर्म क्र. ७,तर नाव ,पत्ता अथवा इतर तपशिलामध्ये दुरुस्ती तसेच स्थलांतरितासाठी फॉर्म क्र.८ भरून द्यावा तसेच या मध्ये पात्र ठरणाऱ्या नागरिकांनी आवश्यक त्या कागदपत्रासह आपला फॉर्म संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) जमा करावा. त्यानंतर जमा होणाऱ्या या फॉर्मची छाननी होऊन २९ ऑक्टोबर २६ पर्यंत त्याची कार्यवाही पूर्ण केली जाणार असून ४ नोव्हेंबर २६ रोजी अंतिम मतदार प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तरी प्रत्येक नागरिकाने जागरूक राहून प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप यादीत आपले नाव आहे किंवा नाही तसेच नाव, पत्ता व इतर तपशील योग्य आहे की नाही याची खातरजमा करावी.तसेच पात्र मतदाराचे नाव वगळले असल्यास किंवा मतदार यादीतील नोंदीबाबत काही हरकत असल्यास विहित मुदतीत असणारे दावे व हरकती दाखल कराव्यात असेही प्रांताधिकारी मते, तहसीलदार दहाडदे व डॉ. नाईक यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

# राज्यात एकल महिलांचे सर्वेक्षण सुरू : प्रथम सोनवणे



**हातगाव** : राज्यातील संपूर्ण जिल्हा,तालुका व ग्रामीण भागातील एकल महिलाना शासन स्तरावरून त्यांना त्यांचे न्याय,हक्क व अधिकार प्राप्त व्हावेत हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन एकल महिलांचे सर्वेक्षण सुरू करण्याबाबतचे आदेश राज्य नगर परिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांनी राज्यातील सर्व नगर परिषद व नगर पंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना नुकतेच दिले असल्याबाबतची माहिती स्त्री - शक्ती फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रथम सोनवणे यांनी दिली आहे. याबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या नगर परिषद प्रशासन संचालनालयामार्फत ही प्रक्रिया सुरू करण्यात आली असून त्यामध्ये एकल महिलांचे सर्वेक्षण करून त्यांची नोंदणी करणे,तसेच त्यांची अद्ययावत माहिती संकलित करण्याबाबत कळवण्यात आलेले आहे. या सर्वेक्षणामधून एकही एकल महिला वंचित राहणार नाही या साठी प्रयत्न करावेत. कारण निरक्षर, अल्पशिक्षित कष्टकरी पात्र एकल महिला,नोंदणीच्या प्रक्रियेपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हे काम महत्वाचे समजून या कामासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करून घरोघरी जाऊन प्रत्यक्ष सर्वेक्षण करावे. व पात्र असणाऱ्या महिलांची नोंदणी करण्यात यावी.तसेच माहिती संकलन करीता गुगल फॉर्म/ गुगल लिंक केल्यास जी माहिती हवी आहे. ती माहिती संकलन सुलभ होईल असेही आदेशात नमूद करण्यात आले असल्याचेही शेवटी सोनवणे यांनी सांगितले.

# श्री ढोकेश्वर महाविद्यालयाच्यावतीने ढोकेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता अभियान



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर** : टाकळी ढोकेश्वर येथील ढोकेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने श्री ढोकेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मंदिर परिसरात स्वच्छता करून परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संदेश दिला. या अभियानात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत परिसरातील कचरा, प्लास्टिक व इतर अनावश्यक वस्तू गोळा करून परिसर स्वच्छ केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची जाणीव, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सार्वजनिक व धार्मिक स्थळांची स्वच्छता राखणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून 'स्वच्छ परिसर, सुंदर परिसर' हा संदेश देण्यात आला. एन.एस.एस. विभागाच्या या उपक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.वीरेंद्र धनशेट्टी,कार्यक्रम अधिकारी डॉ.विजय सुरोशी, प्रा.शुभांगी पवार,प्रा.गोरक्ष साळवे,प्रा.श्रीकांत अल्हाट,डॉ. जिजाभाऊ घुले,डॉ. सुदाम वीर,प्रा.संतोष कोकाटे,प्रा. रोहिणी शिंदे,प्रा.ताई नऱ्हे,प्रा.कोमल बर्डे,प्रा.जयश्री क्षीरसागर,प्रा.पूजा रोडे ,प्रा.जयश्री भोंडवे,प्रा.रमेश झावरे,प्रा.स्नेहल वाळुंज ,प्रा.साक्षी झावरे, प्रा.निशा थोपटे,प्रा.नीलम झावरे, ,डॉ.वैशाली गंगोत्री,डॉ.एकनाथ जाधव,प्रा.महादेव जपकर,प्रा.अभिषेक फंड,प्रा.सोमनाथ चौधरी,प्रा. संजय गायकवाड,सुजित भोंडवे,मुरलीधर खाडे, सुभाष बांडे, प्राध्यापक,शिक्षकेत्तर सेवक व एन.एस.एस. स्वंयसेवक उपस्थित होते.

दैनिक राष्ट्र सह्याद्री



# ‘महाराष्ट्राची वाघीण’ संसारात हरली!

**राष्ट्रीय कुस्तीपटू अश्विनी पौळ यांची तीन मुलांसह आत्महत्या । नळदुर्गच्या किल्ल्यावरून घेतली दरीत उडी**





**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**धाराशिव** : कुस्तीच्या आखाड्यात प्रतिस्पर्ध्यांना चितपट करणारी, राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राचा झेंडा उंचावणारी आणि ‘महाराष्ट्राची वाघीण’ म्हणून ओळख निर्माण करणारी कुस्तीपटू अश्विनी मनोहर पौळ यांची कहाणी अखेर अत्यंत वेदनादायी वळणावर येऊन थांबली. अश्विनी यांनी आपल्या तीन लहान मुलांसह ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्यावरील सुमारे १०० फूट खोल दरीत उडी घेतल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. या घटनेत अश्विनी आणि त्यांचा साडेपाच वर्षांचा मुलगा अजिंक्य यांचा जागीच मृत्यू झाला, तर अडीच वर्षांच्या जुळ्या मुलींपैकी क्रांतीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. दुसरी मुलगी वीरा गंभीर जखमी असून तिच्यावर धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात व्हेंटिलेटरवर उपचार सुरू आहेत.

एका राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूने आपल्या तीन निष्पाप मुलांसह एवढे टोकाचे पाऊल का उचलले, हा प्रश्न आता संपूर्ण महाराष्ट्राला अस्वस्थ करीत आहे. प्राथमिक माहितीनुसार या प्रकरणाची पोलीस कसून चौकशी करीत असून, अश्विनी यांच्या वडिलांनी पती आणि सासरच्या मंडळींकडून मुलीला मानसिक व शारीरिक त्रास दिला जात असल्याचा गंभीर आरोप केला आहे. या आरोपांमुळे घटनेला वेगळे वळण मिळाले असून चौकशीतून नेमके कारण स्पष्ट होणार आहे. अश्विनी या धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील व्हंताळ गावच्या रहिवासी होत्या. कुस्तीचे बाळकडू त्यांना घरातूनच मिळाले. वडिलांनी घरातच तालीम सुरू करून मुलीला आखाड्यासाठी घडविले. जिद्द, मेहनत आणि अपार संघर्षाच्या जोरावर त्यांनी राष्ट्रीय पातळीवर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. २००७ मध्ये तिरुवनंतपुरम येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत त्यांनी सुवर्णपदक पटकावले. त्यानंतरच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्येही त्यांनी चमकदार कामगिरी केली. त्यांच्या कारकिर्दीत पाच सुवर्ण आणि सहा रौप्य पदकांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.

आखाड्यातील प्रत्येक संघर्ष जिंकणारी ही ‘वाघीण’ वैयक्तिक आयुष्यातील संघर्षापुढे मात्र किती असहाय झाली असेल, हा प्रश्न या घटनेनंतर असंख्यांच्या मनाला चटका लावून गेला आहे. अश्विनी यांच्या मृत्यूने केवळ एका खेळाडूचा अंत झालेला नाही, तर तिच्यासोबत दोन निष्पाप चिमुकल्यांचे आयुष्यही संपुष्टात आले आहे. गंभीर जखमी वीरा मृत्यूशी झुंज देत असून संपूर्ण राज्य तिच्या प्रकृतीसाठी प्रार्थना करीत आहे. या प्रकरणातील वडिलांचे आरोप, कौटुंबिक परिस्थिती आणि घटनेमागील नेमके कारण याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. तपासातून सत्य बाहेर आल्यानंतरच या मन सुन्न करणाऱ्या घटनेमागील खरी कहाणी स्पष्ट होणार आहे.

### अश्विनीच्या वडिलांचा गंभीर आरोप

माझी मुलगी राष्ट्रीय पातळीवरील चॅम्पियन कुस्तीपटू होती. देशपातळीवर खेळलेली, अनेक पदके जिंकलेली माझी मुलगी लग्नानंतर मात्र सततच्या त्रासाला सामोरी गेली. सासू, सासरे आणि पतीकडून तिला मानसिक आणि शारीरिक त्रास दिला जात होता. अश्विनीने जिद्दीच्या बळावर पोलीस भरतीची परीक्षा उत्तीर्ण होऊन मुंबईत नोकरीही मिळवली होती. मात्र तिला नोकरी सोडण्यास भाग पाडण्यात आले. तिच्या पगारावरही नियंत्रण ठेवण्यात आले. माहेरून सोनं, पाटल्या आणि पैसे आणावेत, तसेच वाहनासाठी पैसे आणावेत, यासाठी दबाव टाकला जात होता, असे अश्विनी यांच्या वडिलांनी सांगितले.

## महायुतीच्या जलनीतीने अहिल्यानगरच्या दुष्काळमुक्तीला गती



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : वर्षानुवर्षे दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यात सिंचन प्रकल्पांना मंजुरी व भरीव निधी मिळत असल्याने जलसमृद्धीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे रखडलेल्या प्रकल्पांना गती मिळत असल्याचा दावा करण्यात आला आहे. कुकडी प्रकल्पासाठी तब्बल ५ हजार ७०४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, त्यातून अहिल्यानगरसह पुणे व सोलापूर जिल्ह्यांतील १ लाख ४४ हजार ९१२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. डिंभे–माणिकडोह बोगदा हा प्रकल्पातील महत्त्वाचा घटक आहे. दक्षिण अहिल्यानगरातील ३२ दुष्काळी गावांसाठी बहुप्रतीक्षित साकळाई उपसा सिंचन योजनेस १ हजार २३४ कोटी १३ लाख रुपयांची तरतूद मंजूर झाली आहे. त्यामुळे सुमारे ९ हजार ६०० ते १० हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. उत्तर भागासाठी महत्त्वाच्या निळवंडे प्रकल्पाच्या कालव्यांच्या कामांनाही गती देण्यात आली आहे. प्रकल्पाची सुधारित किंमत ५ हजार १७७.३५ कोटी रुपये असून, २०२५–२६ मध्ये राज्य शासनाने ५०० कोटींची तरतूद केली आहे. उर्वरित कामांसाठी केंद्रीय जल आयोगाच्या तांत्रिक सल्लागार समितीने ५ हजार २३ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिल्याचे सांगण्यात आले. गोदावरी–कुकडी, प्रवरा डावा व उजवा कालव्यांच्या सुधारणांसाठी महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत ९९८ कोटी ५८ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मुळा धरण उच्चस्तरीय उजवा कालवा–वांबोरी चारी टप्पा–१ साठी १४ कोटी ६० लाख ६२ हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली असून, यामुळे ३ हजार ५६८ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ अपेक्षित आहे. दरम्यान, संगमनेर तालुक्यातील भोजापूर प्रकल्पाच्या पूरचारीचा समावेश दमणगंगा–वैतरणा–गोदावरी नदीजोड प्रकल्पात करण्यात आला आहे. त्यामुळे भोजापूर लाभक्षेत्रातील ३५ जलसाठे तलाव भरण्यासाठी पाण्याची उपलब्धता होण्याची शक्यता आहे. या विविध प्रकल्पांच्या माध्यमातून शेतीला शाश्वत सिंचन, रब्बी व उन्हाळी पिकांना आधार, फळबागा तसेच कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## महिलेचे दागिने चोरणारी बीडची टोळी जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : बस स्थानकावरील गर्दीचा फायदा घेऊन महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरणाऱ्या बीड जिल्ह्यातील टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने जेरबंद केले. या कारवाईत पोलिसांनी ४५ ग्रॅम वजनाचे सुमारे ६ लाख ७५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण जप्त केले आहे. यावेळी पोलिसांनी दोन महिलांसह तिघांना ताब्यात घेतले आहे. या टोळीकडून इतरही चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलीस सूत्रांकडून वर्तविण्यात येत आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, दिनांक २७ ऑगस्ट रोजी कर्जत येथील आयोध्या दिगंबर कोरडे (रा. शिक्षक कॉलनी, कर्जत ) या जामखेडला जाण्यासाठी कर्जत बस स्थानकावरून एसटी बस मध्ये चढत असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेच्य पोलीस पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करून या तपासा दरम्यान दिनांक ३ सप्टेंबर रोजी या गुन्ह्यातील आरोपी बीड जिल्ह्यातील रहिवासी असून महिला साथीदारांसह मिरजगाव येथे येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्या आधारे पोलीस पथकाने नियोजनबद्ध सापळा रचून मिरजगाव परिसरात परशुराम मल्हारी गायकवाड (वय ४५), लक्ष्मी संजय लोखंडे (वय ५९) आणि पूजा विशाल मोहिते (वय २७, तिघेही रा. बीड ) यांना ताब्यात घेतले. चोरीच्या मुद्देमालाबाबत त्यांच्याकडे चौकशी केली असता काही दागिने नातेवाईकांकडे ठेवल्याची माहिती परशुराम गायकवाड यांनी दिली. त्यानंतर पंचा समक्ष पोलिसांनी नातेवाईकांकडून ४५ ग्रॅम वजनाचे ६ लाख ७५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण जप्त केले. त्यावेळी आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील तपासासाठी कर्जत पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास कर्जत पोलीस करीत आहेत. या कारवाईसाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस अंमलदार श्यामसुंदर जाधव ,प्रताप देवकाते, अमोल कोतकर ,मनोज पाखरे ,योगेश कर्डिले, महादेव भांड, फुरकान शेख, प्रशांत राठोड आणि ज्योती शिंदे यांनी परिश्रम घेतले.

## अहिल्यानगर, पाथर्डीत अवैध गुटखा, मावा विक्रेत्यांवर छापे, ११ जणांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : जिल्हा पोलीस प्रमुख मुमक्का सुदर्शन यांच्या आदेशाने जिल्ह्यातील अवैध व्यवसायिकांवर कडक कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने विविध पथके तयार करून एकाच वेळी अहिल्यानगर, पाथर्डी परिसरात विविध ठिकाणी छापे टाकून सुमारे ५ लाख ३० हजार १४० रुपये किमतीचा सुगंधित तंबाखू मावा व गुटखा जप्त केला. या कारवाईत ११ जणांविरुद्ध चार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध व्यवसायिकांमध्ये घबराट पसरली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, पाथर्डी पोलीस ठाण्याचे हद्दीत दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून आकाश अशोक चातूर (रा. कजबा, पाथर्डी) आणि नेहाल शरीफ आतार (रा. भवानी चौक, पाथर्डी) यांच्यासह फरार असलेल्या फरदीन रफिक शेख आणि रिजवान अमीन शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पथकाने तेथून ८१हार ४ ०० आणि १ लाख १८ हजार ४७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच अहिल्यानगरच्या एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत वडगाव गुप्ता आणि बोलेगाव परिसरात छापा टाकून अमोल सुनील शिंदे व शफिक यासीन शेख यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तर गणेश कोलते व किशोर कोलते हे फरार झाले आहे. या कारवाईत २ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत हर्षद बाबा बागवान याला ताब्यात घेऊन आणि जाहीर व सोय मुसाखान या दोघा फरार आरोपींसह ९८ हजार २७६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात एकूण चार ठिकाणी छापे टाकून ११ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस अंमलदार विजय ठोंबरे, अतुल लोटके, राहुल द्वारके, सागर ससाने, रोहित येमुल, गणेश लोंढे ,निळकंठ कारखिले ,रंजीत जाधव ,सतीश भवर ,बाळासाहेब गुंजाळ यांच्या पथकाने केली.

## झरेकाठीत बिबट्याचा धुमाकूळ; गोठ्यातील बोकड्यावर हल्ला



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथे बिबट्याने शेळ्यांच्या गोठ्यात शिरून बोकड्यावर हल्ला करत त्याला ठार केल्याची घटना शुक्रवार (दि. ४) रोजी सायंकाळी सुमारे ७.४० वाजता घडली. या घटनेमुळे परिसरातील पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. झरेकाठी येथील पवन निकम यांच्या गट नं. ३४९ मधील वस्तीच्या जवळ असलेल्या गायगोठ्यात हा बिबट्या शिरला. त्याने गोठ्यातील बोकड्यावर हल्ला करून त्याला ठार केले. यावेळी पवन निकम यांनी मोठ्याने आरडाओरड केल्याने बिबट्याने ठार केलेल्या बोकड्याला तोंडात धरून तेथून जंगलाच्या दिशेने धूम ठोकली. या घटनेची माहिती झरेकाठी येथील सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ डोळे व प्रशांत वाघमारे यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिली आहे. परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने वनविभागाने तातडीने पाहणी करून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थ व पशुपालकांकडून होत आहे.

## सीसीटीव्हीच्या आधारे चोरटे जेरबंद!

### सहा घरफोड्यांची उकल; चोरीचा मुद्देमालही हस्तगत



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : समनापूर चौफुली येथील राजहंस मिल्क पार्लरचे शटर उचकटून चोरी करणाऱ्या दोघांना संगमनेर शहर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक माहितीच्या आधारे अवघ्या एका दिवसात जेरबंद केले. प्रेम विजय वाल्हेकर (रा. वेल्हाळे, ता. संगमनेर) आणि उमेश गुलाब जारे (रा. म्हसोबानगर, संगमनेर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला असून, त्यांच्या चौकशीत सहा घरफोड्यांची उकल झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. बुधवारी (२ सप्टेंबर) पहाटेच्या सुमारास दोघांनी राजहंस मिल्क पार्लरचे शटर उचकटून दुकानात प्रवेश केला. दुकानातील मुद्देमाल चोरून त्यांनी पलायन केले.

याप्रकरणी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे व पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रमुख पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांच्या पथकाने तपास सुरू केला. घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर चोरट्यांची ओळख पटली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. दरम्यान, दोघांना गुरुवारी (३ सप्टेंबर) न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. अटक आरोपी प्रेम वाल्हेकर याच्यावर यापूर्वी संगमनेर शहर व तालुका पोलिस ठाण्यात सहा गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईत बाबासाहेब सानप, अतुल ढेरे, सागर नागरे, विजय खुळे, विजय आगलावे, राहुल पांडे, समीर शेख व संदीप कोदे यांनी सहभाग घेतला. आरोपींनी इतर भागांतही गुन्हे केले आहेत का, याचा तपास सुरू आहे.

## शेतातील कांदा चोरी करणाऱ्या दोघांना अटक; ५ लाखांचा मुद्देमाल जप्त



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : शेतकऱ्याच्या शेतातून कांदा चोरून नेऊन तो बाजारात विक्री करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघा चोरट्यांना नेवासा पोलिसांनी जेरबंद केले आहे. या कारवाईत पोलिसांनी २७ गोणी कांदा, महिंद्रा पिकअप व चारचाकी वाहन असा सुमारे ५ लाख ३६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. नेवासा तालुक्यातील शिरसगाव येथील शेतकरी सुधीर आसाराम लोंढे यांनी २० ऑगस्ट २०२६ रोजी नेवासा पोलिसांत तक्रार दिली होती की त्यांच्या शेतातील कांद्याच्या शेडमधून सुमारे ४० गोणी कांदा अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला होता. याप्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असताना पोलिसांना कांदा व्यापारी घोडेगाव यांच्याकडून महत्त्वाची माहिती मिळाली की दोन इसम कांदा विक्रीसाठी नेवासा फाटा परिसरात आले आहे हे समजताच पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दोघांना ताब्यात घेतले.चौकशीत संशयितांनी चोरीची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी त्यांच्या ताब्यातील २७ गोणी कांदा व एक महिंद्रा पिकअप वाहन जप्त केले. तसेच कांदा चोरीसाठी वापरलेले चारचाकी वाहनही जप्त करण्यात आले आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे शेतमाल चोरी करणाऱ्या टोळ्यांना चांगलाच दणका बसला असून, शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या सुरक्षेबाबत नेवासा पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे दिसून आले आहे. दरम्यान, नेवासा तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपला कांदा किंवा अन्य शेतमाल चोरीला गेल्यास तात्काळ नेवासा पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी केले आहे.

# कर्जाच्या ओझ्यात शेतकरी; आता सर्च रिपोर्टच्या फी चा ही ‘फटका’!

**सर्च रिपोर्टची शासकीय फी थेट दुप्पट; शेतकऱ्यांना हजारोंचा अतिरिक्त भुर्दंड**



**सुधीर चव्हाण । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : शेतीच्या वाढत्या उत्पादन खर्चाने आधीच मेटाकुटीला आलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणीत आता कर्जप्रकरणासाठी आवश्यक असलेल्या सर्च रिपोर्टच्या वाढीव शुल्काची भर पडली आहे. शासनाच्या नव्या आदेशानुसार ११ ऑगस्टपासून सर्च रिपोर्टसाठी आकारण्यात येणारे शासकीय शुल्क दुप्पट करण्यात आल्याने कृषी कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.

विशेष म्हणजे सर्च रिपोर्ट तयार करण्यासाठी वकिलांना द्यावे लागणारे शुल्कही त्याच प्रमाणात वाढत असल्याने कर्ज घेण्याची प्रक्रिया शेतकऱ्यांसाठी अधिकच खर्चिक ठरत आहे.

शेतकरी लहान असो अथवा मोठा, कर्जाशिवाय शेती करणे आता जवळपास अशक्य झाले आहे. बियाणे, खते, औषधे, मशागत, मजुरी, सिंचन आणि इतर खर्च भागविण्यासाठी शेतकऱ्यांना बँकांच्या कृषी कर्जाचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे ‘शेतकरी’ आणि ‘कर्जदार’ हे शब्द जणू समानार्थीच झाले आहेत. शासनाकडून वेळोवेळी कर्जमाफीच्या घोषणा झाल्या, तरी प्रत्यक्षात शेतीचे चक्र सुरू ठेवण्यासाठी शेतकऱ्याला पुन्हा कर्जाच्या दारात उभे राहावे लागते.

प्रत्येक गटासाठी स्वतंत्र सर्च रिपोर्टचा बोजा कृषी कर्ज घेताना संबंधित जमिनीचा मालकी हक्क, पूर्वीचे व्यवहार, बोजा किंवा इतर कायदेशीर बाबी तपासण्यासाठी सर्च रिपोर्ट घेणे आवश्यक असते. शेतकऱ्याच्या नावावर असलेल्या प्रत्येक गटाची तपासणी करून त्याचा अहवाल कर्जप्रकरणासोबत जोडावा लागतो.

पूर्वी दुय्यम निबंधक कार्यालयाकडील सर्च रिपोर्टसाठी प्रत्येक घटकासाठी ७५० रुपये शुल्क आकारले जात होते. मात्र, ११ ऑगस्टपासून हे शुल्क दुप्पट होऊन १,५०० रुपये झाले आहे. त्यातच सर्च रिपोर्ट तयार करणाऱ्या वकिलांचे मानधनही वाढत असल्याने प्रत्यक्ष खर्च आणखी वाढला आहे.

विशेषतः अनेक शेतकऱ्यांची जमीन एकाच ठिकाणी नसून दोन, तीन, पाच किंवा त्याहून अधिक गट क्रमांकांमध्ये विभागलेली आहे. त्यामुळे एका शेतकऱ्याच्या एका कर्जप्रकरणासाठीच अनेक सर्च रिपोर्ट काढावे लागतात. दहा–बारा गट असलेल्या शेतकऱ्यांच्या बाबतीत तर हा खर्च हजारोंच्या घरात पोहोचण्याची शक्यता आहे.

### कर्ज मिळण्याआधीच खिशाला मोठा फटका

कृषी कर्ज हे तुलनेने कमी व्याजदराचे कर्ज मानले जात असले, तरी कर्ज मिळविण्यापूर्वीच विविध कागदपत्रे, फेरफार, उतारे, सर्च रिपोर्ट, वकिलांचे शुल्क आणि इतर प्रक्रियात्मक खर्च शेतकऱ्याला करावा लागतो. अशा परिस्थितीत सर्च रिपोर्टचे शुल्क अचानक दुप्पट करणे म्हणजे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्याच्या खिशावर अतिरिक्त भार टाकण्यासारखेच असल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत. शेतीमालाला हमीभाव नाही, उत्पादन खर्च वाढत आहे, नैसर्गिक आपत्तीचा धोका कायम आहे आणि बाजारभावातील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडलेले असताना कर्जप्रक्रियेचा खर्च वाढविण्याचा निर्णय कितपत योग्य आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.कर्ज घेऊन शेती करणाऱ्या शेतकऱ्याला कर्ज देण्याआधीच अधिक पैसे मोजायला लावणे म्हणजे त्याच्या आर्थिक अडचणीत आणखी भर घालणे नव्हे का? असा संतप्त सवाल शेतकरी वर्गातून उपस्थित केला जात आहे.

### फी वाढीचा फेरविचार करण्याची मागणी

शेतकऱ्यांच्या कृषी कर्जप्रकरणासाठी आवश्यक असलेल्या सर्च रिपोर्टच्या शुल्कात करण्यात आलेली वाढ तातडीने मागे घ्यावी किंवा किमान कृषी कर्जप्रकरणांसाठी स्वतंत्र सवलतीचे शुल्क निश्चित करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अन्यथा कर्जप्रक्रिया सुलभ करण्याऐवजी शासनाच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा अप्रत्यक्षपणे वाढत राहणार असल्याची भीती व्यक्त होत आहे.

### ‘शेतकऱ्यांना आर्थिक दुर्बल करणारा आदेश’

सर्च रिपोर्टची वाढलेली फी आणि त्याप्रमाणे वकिलांचे शुल्कही वाढत असल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्याला कर्ज घेण्यासाठीच अधिक खर्च करावा लागणे अन्यायकारक आहे. हा आदेश शेतकऱ्यांना अधिक आर्थिक दुर्बल करणारा ठरत आहे.

**- ॲड. सुजित गरड**

### ‘दहा-बारा गटांचा सर्च काढताना हजारोंचा खर्च!’

आमच्या शेतजमिनी दहा–बारा गटांमध्ये विखुरलेल्या आहेत. प्रत्येक कर्जप्रकरणासाठी प्रत्येक गटाचा सर्च रिपोर्ट काढावा लागतो. पूर्वीच कर्ज घेणे ही गरज होती; आता सर्च रिपोर्टची फी दुप्पट झाल्याने कर्ज घेण्याचा प्रारंभिक खर्चही दुप्पट झाला आहे. हा खर्च शेतकऱ्यांसाठी सहन न होणारा असून फीवाढ अन्यायकारक आहे.

**- नाना घोलप, बागायतदार**


